म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. १७६१
BVBK-0401761
BVBK-0401761

वा॰ वा॰-
१५६१

# राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

BVBK-0401761

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत.
या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा
यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी
आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | बहिरा संशोधक | ५ |
| २) | विलक्षण वाटाड्या | ५ |
| ३) | चतुर न्यायाधीश | ६ |
| ४) | नागकथा | ७ |
| ५) | गुरू तेगबहादरची कहाणी | ९ |
| ६) | खंडोबाची कहाणी | ११ |
| ७) | अरुद्राची कथा | १२ |
| ८) | वैकुंठाची कथा | १३ |
| ९) | मोक्षदा एकादशीची कथा | १४ |
| १०) | कृष्ण-अर्जुन कथा | १५ |
| ११) | गंगाजन्म | १६ |
| १२) | कबीरवटाची कथा | १७ |
| १३) | दत्तजयन्ती कथा | १८ |
| १४) | यल्लमाची कथा | १९ |
| १५) | चाफ्याची कहाणी | २० |
| १६) | भृगुतीर्थाची कथा | २२ |
| १७) | मंगलेश्वराची कथा | २२ |
| १८) | अश्वत्थवृक्षाचा महिमा | २३ |
| १९) | मोरया गोसावी | २४ |
| २०) | अजातशत्रू | २५ |
| २१) | चतुर प्रधान | २[illegible] |
| २२) | इसापची कसोटी | २[illegible] |
| २३) | लोभी राजाची परीक्षा | २[illegible] |
| २४) | रसिक चोर | ३० |
| २५) | लक्ष्मीव्रताची कथा | ३१ |
| २६) | वासुकिनाथ ज्योतिर्लिंगाची कथा | ३२ |
| २७) | भौमव्रताची कथा | ३३ |
| २८) | भ्रमरांबेची कथा | ३४ |
| २९) | मुंडला मुडम्माची कथा | ३४ |
| ३०) | रविनारायण | ३५ |
| ३१) | यात्रकळी | ३६ |
| ३२) | मौनव्रताची कथा | ३७ |
| ३३) | रघुनाथ-शिरोमणीची कथा | ३८ |
| ३४) | लबाड राजाला इंगा | ३८ |
| ३५) | मंथरक | ४३ |
| ३६) | म. जोतिबा फुले | ४५ |
| ३७) | परमेश्वराचे दर्शन | ४८ |

म. ग्रं. सं. ...
वा. क्र. १७६१ २८।४।८५
विषय वा-वा

## १ बहिरा संशोधक

इलेक्ट्रिक बल्ब वगैरे नाना तऱ्हेचे शोध लावणारे नामवंत पाश्चात्य संशोधक टॉमस एडिसन हे बहिरे होते. तर एकदा कानाच्या एका डॉक्टरनं त्यांचे कान तपासून सांगितलं, " शस्त्रक्रिया करून तुमचे कान सुधारता येतील. बहिरेपणा जाईल तुमचा. केव्हा शस्त्रक्रिया करायची ते सांगा. "

त्यावर एडिसनमहाशय बोलले, " म्हणजे... शस्त्रक्रिया करून बहिरेपणापासून मिळणारे फायदे मी गमावून बसू म्हणता ? मी संशोधन करीत असल्यानं विचारात गढलेला असतो. मग त्यातून सुचणारे प्रयोग करीत राहणं हा माझा उद्योग. तेव्हा निवांतपणे विचार करायला माझा बहिरेपणा मला चांगला उपकारक ठरतो. कारण आसपास कुणी कितीही गडबडगोंगाट केला तरी मला त्यातलं काही ऐकू येत नसल्यानं त्याची मला मुळीच बाधा होत नाही. त्यामुळं एकाग्रचित्तानं मी विचार अन् प्रयोग करू शकतो. म्हातारा होऊन प्रकृती दुबळी झाली, नि माझ्या हातून काम होईनासं झालं म्हणजे मग करता येईल शस्त्रक्रियेचा विचार. तोपर्यंत बहिरेपणा आहे तसाच राहू देणं बरं ! "

## २ विलक्षण वाटाड्या

एकदा एका संध्याकाळी एक प्राध्यापक गावाबाहेर फिरायला गेले. तर विचाराच्या तंद्रीत हिंडत हिंडत ते गावापासून बरेच दूरवर गेले. रात्र पडून अंधार झाला, तेव्हा ते भानावर आले. तेव्हा त्यांच्या

लक्षात आलं की, आपण वाट चुकून भरकटत कुठल्या कुठं येऊन पोचलोत. आता कोणती वाट धरल्यास आपण नीटपणे माघारी परतू ? असा चिंताजनक प्रश्न त्यांना पडला. तेवढ्यात काळोखात कुणाची तरी चाहूल त्यांना ऐकू आली. लौकरच एक गृहस्थ त्यांच्याजवळ येऊन ठेपला. तेव्हा त्याला प्राध्यापकांनी विनंतीपूर्वक विचारलं, "काय हो, गावाकडं जायला जवळची कुठली वाट ?" तो गृहस्थ बोलला, "गाव तसं फारसं लांब नाही, पण तुम्हाला गावात कुठंसं जायचं आहे ?" प्राध्यापकांनी आपलं ठिकाण सांगताच तो गृहस्थ म्हणाला, "चिंता करू नका. मी तुम्हाला तुमच्या घरापाशी अचूक नेऊन सोडतो."

काळोखात त्या गृहस्थाच्या पाठीमागून चालत प्राध्यापकांनी एकदाचं आपलं घर गाठलं. तेव्हा त्यांचा निरोप घेण्याआधी तो वाटाड्या गृहस्थ त्यांना म्हणाला, "मी कशा प्रकारचा माणूस आहे हे तुम्हाला आधी कळलं असतं, तर माझ्याबरोबर यायचं धाडस तुम्ही केलं नसतंत बघा." या त्याच्या उद्‌गारांवरून प्राध्यापक चमकले. म्हणजे, हा कुणी चोर-भामटा तर नाही ना ? अशी शंका त्यांना आली. त्याच्याकडं चमत्कारिकपणे पाहत बिचकतच त्यांनी विचारलं, "म्हणजे ? तुम्ही असे आहात तरी कोण ?" वाटाड्या हसून उत्तरला, "तसं घाबरण्याचं कारण नाही, पण मी ठार आंधळा आहे."

## ३ चतुर न्यायाधीश

इटालीतील जुन्या काळची गोष्ट आहे. तिथं चतुराईनं न्याय देण्याबद्दल एक न्यायाधीश वाखाणला जाई. एकदा एका सरदारानं त्याच्यापुढं फिर्याद आणली की, रस्त्यात एका मोळीवाल्यानं आपल्याला धक्का दिला. त्यामुळं मोळीतलं लाकूड लागून आपला अंगरखा फाटला.

खरं म्हणजे त्या मोळीवाल्यानं 'दूर व्हा, साहेब' असं पुन:पुन्हा त्या सरदाराला ओरडून सांगितलं होतं, पण त्या सरदारानं त्याच्याकडं

लक्ष दिलं नव्हतं. तरीसुद्धा शक्यतेवढं जपून मोळीवाला त्याच्या बाजूनं गेला, पण मोळीतील एक लाकूड शेवटी सरदाराला थोडं लागलंच आणि त्याचा अंगरखा थोडा फाटला. न्यायाधीशानं मोळीवाल्याला एकट्याला आपल्या खोलीत बोलावून सगळी हकीगत विचारून घेतली. मग त्यांनी त्या मोळीवाल्याला सांगितलं, "हे बघ, फिर्याद कोर्टात सुरू होईल, तेव्हा तू मुका असल्याचा बहाणा कर. केवळ खुणा करून माझ्या प्रश्नांची उत्तरं दे. मग पुढे काय ते मी पाहतो."

कोर्टात खटल्याचं काम सुरू होताच न्यायाधीशानं फिर्यादी सरदाराला विचारलं, "या मुक्या माणसाविरुद्ध काय तक्रार आहे तुमची?"

सरदार घुस्सा करीत फिस्करला, "न्यायाधीशमहाराज, हा माणूस मुका असल्याचं ढोंग करतोय. त्याला बोलता येतं याबद्दल खात्री आहे माझी. कारण याच्या मोळीतलं लाकूड माझ्या अंगरख्याला टोचण्यापूर्वी 'दूर व्हा, साहेब' असं हा वारंवार ओरडल्याचं मी माझ्या कानांनी स्पष्ट ऐकलंय."

"वा: !" न्यायाधीश निक्षून करारीपणाने उद्गारला, "त्यानं तुम्हाला 'दूर व्हा' असं वारंवार ओरडून सांगितलं म्हणता, तर मग बाजूला का झाला नाहीत तुम्ही? अर्थात यात त्याचा दोष नसून तुमचाच आहे. तेव्हा तुम्हीच उलटा कांगावा करून याच्यावर फिर्याद केल्याबद्दल याच्या अब्रुनुकसानीबद्दल तुम्हीच याला १०० रुपये द्यायला हवेत."

## ४ नागकथा

पार्श्वनाथ एकदा एका नगरीत गेला, तर तिथे कमठ या नावाच्या दानवाने त्याच्यावर मुसळधार वृष्टी चालवली. त्यावेळी एका नागाने पार्श्वनाथाच्या माथ्यावर आपल्या फणेचे छत्र उभारून त्याला सुरक्षित राखले. या घटनेवरून त्या नगरीचे नाव मग अहिच्छत्रा म्हणून प्रचलित झाले.



कथासरित्सागर या ग्रंथात नागाविषयीची एक कथा अशी आहे–

उदयन राजा एकदा अरण्यात हिंडत होता. तिथे एक गारुडी साप पकडत असलेला त्याच्या नजरेस पडला. सापाची दया येऊन राजाने त्या गारुड्याला सापाला सोडून द्यायला सांगितले. तर गारुडी त्याला बोलला, " महाराज, सापाला खेळवून चार पैसे कमावून पोट भरतो मी. माझ्या उपजीविकेचे साधन आहे हे. त्याला सोडून माझे कसे चालेल ?" त्याचे म्हणणे उदयनला पटले. म्हणून त्याने आपल्या गळ्यातला रत्नहार काढून गारुड्याला दिला. गारुड्याने मग सापाला सोडून दिले. आपल्यावर उपकार केल्याबद्दल त्या सापाने उदयन राजाला एक वीणा व काही अमूल्य वस्तू अर्पण केल्या.

मार्गशीर्ष शुद्ध पंचमीला नागदिवाळी मानतात. या तिथीला नागाच्या प्रतिमेची पूजा करतात. दुसरे असे की, महाराष्ट्रात ही तिथी पाळणारे घरातल्या प्रत्येक पुरुषाच्या नावे एकेक पक्वान्न करून त्यावर दिवा लावतात. नाग हे कुळाच्या मूळ पुरुषाचे प्रतीक मानले जाते, तर दिवा हे दीर्घायुष्याचे प्रतीक. घरात असलेल्या पुरुषांना दीर्घ आयुष्य

लाभावे, यासाठी नागरूपी मूळ पुरुषाची कृपा संपादन करण्याचा हेतू या पूजेमागे असतो.

▭

## ५ गुरू तेगबहादरची कहाणी

शिखांचा नववा गुरू होता तेगबहादर. सहावा गुरू हरगोविंद याचा हा मुलगा. हा अमृतसरमधे जन्मला (सन १६२१) तेव्हा त्याचं नाव ठेवलं होतं त्यागमल. पण तो मोठा तलवारबहाद्दर होऊन धर्मरक्षणासाठी झटेल, असं भविष्य त्याच्या बापानं वर्तवलं होतं. म्हणून मग त्याला तेगबहादर म्हणण्यात येऊ लागलं. बापाच्या मृत्यूनंतर हा बकाला या गावी बायकोसह जाऊन राहिला. संसारात असूनही तो वैराग्यवृत्तीनं वागायचा. शिखांचं गुरुपद आपल्याला मिळावं अशी त्याची मुळीच इच्छा नव्हती. पण ते गुरुपद त्याच्या पायाशी कसं चालून आलं, ते सांगणारी कथा अशी आहे–

शिखांचा आठवा गुरू हरकिशन मृत्युशय्येवर पडलेला असताना, "पुढचा गुरू कोण ?" असं अनुयायांनी त्याला विचारलं. तेव्हा 'बाबा बकाला' एवढेच शब्द त्यानं उच्चारले. जास्त खुलासा होण्याआधीच त्याचं देहावसान झालं. आपला पुढचा गुरू बकाला या गावी असेल, असा शीखांचा समज झाला.

गुरू हरकिशन निधन पावल्यावर शीख लोक बकाला गावी जाऊन गुरूचा शोध घेऊ लागले. त्या काळी शीखांच्या गुरूच्या गादीला सत्ता व वैभवाची झळाळी होती. तेव्हा ते पद लाभावं म्हणून अनेकांना मोह सुटला. 'बाबा बकाला' हे मावळत्या गुरूचे अखेरचे शब्द ध्यानी घेऊन तब्बल बावीस सोढी खत्री बकाला इथं जाऊन राहिले. नवीन गुरू आपणच असल्याचा देखावा करू लागले. त्यांच्यांतला खरा गुरू ठरवणं शीख अनुयायांना अशक्य झालं. एका शीख व्यापाऱ्यानं यावर तोड काढली. काही दिवसांपूर्वी त्याचं जहाज समुद्रात बुडू लागलं तेव्हा,

आपण यातून वाचलो, तर गुरूला ५०२ मोहरा देऊ, असा नवस त्या-वेळी तो बोलला होता. तो नवस फेडण्याच्या हेतूनं नवीन गुरू भेटेल, या अपेक्षेनं तो बकाला इथं येऊन ठेपला होता. बावीसजणांची गुरुपदा-साठी अहमहमिका लागलेली पाहून त्यानं एक युक्ती योजली. आपणच गुरू असल्याचा दावा करणाऱ्या प्रत्येकजणाला त्यानं दोन-दोन मोहरा दिल्या. ते सारे तोतया गुरू तेवढ्यावरच संतुष्ट झाले. तेवढ्यात त्याला कुणीतरी तेगबहादुराचं नाव सांगितलं. त्या व्यापाऱ्यानं तेगबहादरालाही दोन मोहरा सादर केल्या. तेगबहादरानं अंतर्ज्ञानानं सारं काही जाणलं. आणि त्यानं व्यापाऱ्याला छेडलं : "गुरू म्हणून तू मला अवघ्या दोनच मोहरा देतोयस ? तू तर तब्बल पाचशे मोहरा गुरूला देण्याचा नवस बोलला होतास."

खरा गुरू कोण याची व्यापाऱ्याला पारख झाली. त्यानं तेगबहादराच्या घरावर लगेच झेंडा फडकावला, आणि 'शिखजनहो, हाच तुमचा गुरू. याला गादीवर बसवा,' असा घोष केला. मग शीख अनुयायी जमले आणि तेगबहादराचा जयघोष करून त्याला त्यांनी गादीवर बसवलं.

पण तेगबहादराला विरोधाला तोंड द्यावं लागलं. त्यांचा फार त्रास होऊ लागल्यानं त्यानं शिवालिक पर्वतराजीत आनंदपूर हे नवीन नगर वसवलं व तिथं गुरुगादी स्थापली. मग त्यानं काश्मीरपासून आसामपर्यंत भारतयात्रा करून हिरीरीनं धर्मप्रचार केला. हिंदूंप्रमाणे वरेच मुसलमानही शीख धर्मात सामील झाले. तेगबहादराचा वाढता प्रभाव पाहून मोगल बादशहा औरंगजेब बिथरला. 'काश्मीरातल्या सर्वच्या सर्व हिंदूंना मुस्लिम धर्म स्वीकारायला लाव. नकार देतील त्यांना बेधडक ठार कर,' असा हुकूम त्यानं काश्मीरच्या सुभेदाराला सोडला.

हा हुकूम ऐकून हिंदूंची गाळण उडाली. ते तेगबहादराला शरण गेले: 'आम्हाला धर्मांतरापासून वाचवा' अशी त्याची त्यांनी आळवणी केली. हिंदूंच्या धर्मरक्षणासाठी तेगबहादर स्वतःचं बलिदान करायला सिद्ध झाला. काश्मीरी ब्राह्मणांना त्यानं सांगितलं : "तुम्ही औरंग-

जेबाला जाऊन सांगा– आमचा धर्मगुरू तेगबहादर आहे. आधी त्याला मुसलमान बनव. त्यानंतर आम्ही तो धर्म स्वीकारू.”

काश्मीरी ब्राह्मणांकडून औरंगजेबाला तसा जबाब मिळताच त्यानं तेगबहादरला तावडतोब पकडून आणून दिल्लीत कैदेत ठेवलं. ‘तुझ्या धर्माचा काहीतरी साक्षात्कार दाखव; नाहीतर इस्लाम धर्म पत्कर,’ असा निरोप औरंगजेबानं त्याला तुरुंगात पाठवला. तेगबहादर त्यातल्या एकाही गोष्टीला कबूल झाला नाही. तेव्हा औरंगजेबानं चांदणीचौकात त्याचा शिरच्छेद केला. (ते ठिकाण शीशगंज या नावानं सध्याही ख्याती पावलं आहे.) जैता नावाच्या भंग्यानं जिवाचा धडा करून तेगबहादराचं शिर तेवढं शिताफीने पळवलं व आनंदपूरला नेलं.

तेगबहादराच्या या अपूर्व बलिदानानं सहस्रावधी शीख धर्मरक्षणासाठी प्राणपणानं लढायला सिद्ध झाले. त्यांची संघटना बळावली.

## ६ खंडोबाची कहाणी

खंडोबा हा मूळचा कर्नाटकातला मैलार नावाचा देव. ‘मल्लारीमाहात्म्य’ या ग्रंथातून त्याला महाराष्ट्रानं संस्कृतचरित्रात आणलं आहे. खंडोबाची चरित्रकथा त्यात दिली आहे, ती अशी–

कृत युगात धर्मपुत्र सप्तर्षींनी मणिचूल पर्वतावर तप आचरलं होतं. तर त्या ऋषींचं तपोवन मणी व मल्ल नावांच्या दैत्यांनी पार उद्ध्वस्त केलं. तेव्हा ऋषींनी इंद्राकडं जाऊन दाद मागितली; पण ब्रह्मदेवाच्या वरामुळं ते मल्ल अजिक्य होऊन राहिले आहेत; त्यामुळं त्यांचं पारिपत्य आपल्याला काही करता येणार नाही, अशी आपली असहाय्यता इंद्रानं व्यक्त केली. त्यानं त्यांना विष्णूकडं जायचा सल्ला दिला. पण विष्णूही दाद घेईना. म्हणून शेवटी शिवाला त्यांनी साकडं घातलं. मणि-मल्लांनी केलेला विध्वंस ऐकून तो मात्र संतापला. त्यानं मार्तंड-भैरवाचं रूप धारण केलं आणि आपल्या सात कोटी (येळकोट)

गणांचं सैन्य घेऊन कार्तिकेयासह तो मणिचूल पर्वतावर चालून गेला. उभयतांच्या सैन्यांची तुंबळ धुमश्चक्री झाली. पण अखेर मार्तंड-भैरवानं मणी दैत्याचं छाताड फोडून त्याला जमीनदोस्त केलं. तेव्हा मणीनं त्याचे पाय धरले, व त्याची स्तुती केली; आणि मागणं मागितलं, की— "माझ्या मस्तकाला तुझ्या पायांशी कायमचं स्थान दे. तसंच माझं अश्वारूढ रूपही तुझ्या शेजारी राहावं, अशी इच्छा आहे."

'तथास्तु' म्हणून मार्तंडभैरवानं त्याच्या मस्तकावर आपला पाय ठेवला. लौकरच त्यानं मल्ल दैत्यालाही जमीनदोस्त केलं. तेव्हा त्यानं मागणं मागितलं— "तुझ्या नावाच्या आधी माझं नाव जोडलं जावं." (म्हणजे मल्ल + अरि = मल्लारीमार्तंड अशा नावानं लोकांनी तुला ओळखावं.) 'तथास्तु' म्हणून त्याचंही मागणं मार्तंडभैरवानं मान्य केलं.

दैत्यांचा निःपात झाल्यावर सातही ऋषींनी त्याला प्रेमपूर (पेंबूर) इथं लिंगरूपानं वास्तव्य करायला विनवलं; तेही त्यानं मानलं.

## ७ अरुद्राची कथा

सेंदनार नावाचा एक मोळीविक्या होता. जळणाची लाकडं विकून जी कमाई व्हायची तिच्यातून तो एका शिवभक्ताला भोजन घालायचा. एके दिवशी पावसानं लाकडं भिजल्यानं त्याला फारशी कमाई झाली नाही. थोडं पीठ तेवढं मिळालं. त्या पिठाचा त्यानं कली पदार्थ बनवला. तर त्यावेळी खुद्द नटराज वृद्ध ब्राह्मणाच्या रूपानं त्याच्यासमोर आला. बनवलेला कली मोळीविक्यानं त्याला दिला. नटराज तो कली घेऊन आपल्या मंदिरात आला. लोकांना तो पदार्थ मंदिरात सांडलेला आढळला. तेव्हा त्यांनी तो प्रसाद म्हणून ग्रहण केला. तेव्हापासून नटराजाला कली अर्पण करण्याची प्रथा पडली.

तमिळनाडूमधे अरुद्रा नावाचा सण मार्गशीर्षात साजरा करतात. तिथं मार्गशीर्षाला मार्गळी म्हणतात. या महिन्यात आर्द्रा नक्षत्राच्या

दिवशी नटराजाची पूजा या सणानिमित्त करतात. अरुद्रा नक्षत्रावर नटराज शिवाची पूजा केली, की मनुष्याला शुद्धता व इच्छाशक्ती प्राप्त होतात, अशी त्या लोकांची श्रद्धा आहे. या पूजेनिमित्त 'कली' नावाचा पदार्थ शिवाला अर्पण करण्यात येतो.

## ८ वैकुंठाची कथा

कृत युगात मुरन हा असुर देवांना अतिशय त्रास देऊ लागला. तेव्हा भगवान विष्णूनं अवतार घेऊन त्याला ठार मारलं. त्यावेळी विष्णूसह मुक्कोडी (तीन कोटी) देव पृथ्वीवर अवतरले. तो दिवस होता मार्गशीर्ष शुद्ध एकादशीचा.

या एकादशीला विष्णूची पूजा करून उपवास करतात. या एका एकादशीनं अनेक साध्या एकादशा केल्याचं पुण्य लाभतं, असं मानतात. या व्रताची कथा अशी आहे–

रुक्मांगद नावाच्या राजाच्या राजधानीत सदैव सुवासिक फुलांनी बहरलेलं उद्यान होतं. परमेश्वराच्या पूजेसाठी एकदा इंद्राला फुलं हवी झाली. म्हणून त्यानं फुलं आणायला काही देवांना पृथ्वीवर धाडलं. तर ते देव रुक्मांगदाच्या बहरलेल्या उद्यानातली फुलं रोज खुशाल चोरून नेऊ लागले. ते अदृश्यपणे चोरी करीत असत, त्यामुळं ते कुणाला दिसायचे नाहीत. फुलं मात्र रोज नाहीशी झालेली आढळायची.

एके दिवशी जाबाली ऋषी या उद्यानापाशी चिंतन करीत बसला होता, तर तोच फुलं चोरून नेत असला पाहिजे, असा पहारेकऱ्यांचा समज झाला. म्हणून त्यांनी जाबालीला धरून राजापुढं नेलं. जाबालीला राजा ओळखत होता. त्यामुळं पहारेकऱ्यांनी गैरसमजुतीनं त्याला धरून आणल्याचं त्यानं जाणलं व त्यांची क्षमा मागितली. फुलं गुपचूप चोरीला जाण्याचा प्रकार जाबालीला कळताच त्यानं राजाला काही वनस्पती दिल्या. व उद्यानात त्या जाळून त्यांचा धूर करायला सांगितलं. राजानं तशी व्यवस्था केल्यावर त्या धुरामुळं, फुलं चोरायला आलेले देव पार्थिव

स्वरूपात स्पष्ट दिसू लागले. तेव्हा पार्थिव देह लाभल्यामुळं देवांना स्वर्गात परत जाता येईना. त्यांनी राजाला खरी हकीकत सांगितली. त्यासाठी त्यांना सूक्ष्म रूप प्राप्त करून घेण्यासाठी कुणाचं तरी पुण्यफळ हवं होतं. तसं करण्याची कुणाची तयारी आहे, याचा शोध घेण्यासाठी राजानं दवंडी पिटवली. तेव्हा एका धोबिणीनं आपलं वैकुंठ एकादशी व्रताचं पुण्य देवांना दिलं. त्या पुण्यामुळं देवांना स्वर्गात परत जाता आलं.

---

## ९ मोक्षदा एकादशीची कथा

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला श्रीकृष्णानं कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीतेचा उपदेश केला. या तिथीला मोक्षदा एकादशी म्हणतात. पितरांच्या उद्धारासाठी हे व्रत करायचं असून त्याची कथा अशी–

वैखानस नावाचा राजा चंपकनगरात राहत असे. तर एके रात्री त्याच्या पितरांनी त्याच्या स्वप्नात येऊन सांगितलं: "आम्ही नरकयातना भोगीत आहोत. तर यांतून आमची सुटका होईल यासाठी काहीतरी इष्ट धर्मकार्य कर."

पितरांची दु:स्थिती समजताच राजाला अतिशय दु:ख झालं. तो सरळ पर्वत ऋषीकडं गेला आणि त्याला त्यानं आपल्या पितरांची स्थिती कथन केली. त्यांचा उद्धार होईल असा काहीतरी मार्ग सांगा, अशी विनंती त्यानं ऋषीला केली. ऋषी म्हणाला, "यासाठी तू मोक्षदा एकादशीचं व्रत कर."

त्याप्रमाणं राजानं मोक्षदा एकादशीचं व्रत केलं. तेव्हा मग त्याच्या सर्व पितरांना मोक्ष लाभला.

## १० कृष्ण-अर्जुन कथा

भारतीय युद्धात एके दिवशी कर्णानं युधिष्ठिराचा पराभव केला. तेव्हा रणक्षेत्र सोडून तो शिबिरात परतला. युद्धभूमीवर तो कुठं दिसेनासं पाहून त्याला शोधत अर्जुनही शिबिरात गेला. कर्णाचा वध करूनच तो शिबिरात परतला असेल, अशी युधिष्ठिराची समजूत झाली. पण कर्णाला न मारताच तो आलेला आहे हे कळताच युधिष्ठिर संतापून उद्गारला:

" तुझं गांडीव धनुष्य कुचकामी ठरत असेल, तर जाळून टाक ते."


आपल्या गांडीव धनुष्याबद्दल कुणी अपशब्द बोलला, तर त्याचा आपण शिरच्छेद करू, अशी प्रतिज्ञा अर्जुनानं केलेली होती. त्यामुळं युधिष्ठिराच्या उद्गारांनी तो संतापला व तलवार घेऊन त्याला मारायला सरसावला. तेवढ्यात तिथं आलेल्या कृष्णानं अर्जुनाला अडवीत म्हटलं: " महामूर्ख आहेस. मूर्खपणानं केलेल्या प्रतिज्ञेपायी तू प्रत्यक्ष युधिष्ठिराला मारू पाहतोयस ? त्यामुळं ओढवणाऱ्या संकटाची कल्पना आहे का तुला ?"

रागाच्या भरात आपण केवढं भयंकर कृत्य करणार होतो, याची जाणीव होऊन अर्जुन ओशाळला. मग कृष्णाला आर्जवीत म्हणाला: "मी मूर्खपणानं वागलो खरा. पण यातून बाहेर पडण्याचा असा काही मार्ग सांग, की ज्यातून माझ्या प्रतिज्ञेलाही बाधा येणार नाही आणि युधिष्ठिराला मला मारावं लागणार नाही."

त्यावर कृष्णानं सांगितलं– " गुरूची तोंडावर निंदा करणं म्हणजे त्याचा वध करण्यासारखंच आहे. युधिष्ठिर हा तुझा ज्येष्ठ बंधू–गुरुसमानच आहे. त्याची निर्भर्त्सना केल्यानं तुझी प्रतिज्ञेतून सुटका होईल."

तसं करून अर्जुन मोकळा झाला. पण यातून अर्जुनापुढं दुसरी समस्या उभी राहिली: " जो युधिष्ठिराचा जीव घेईल त्याचा मी शिरच्छेद करीन." अशी त्याची दुसरी प्रतिज्ञा होती. त्याच्या स्वतःच्या हातूनच आता ते कृत्य घडल्यानं स्वतःचं डोकं उडवणं, त्याला क्रमप्राप्त झालंय, ही गोष्ट त्यानं कृष्णाच्या नजरेस आणून दिली.

श्री. मं. सं. ठाणे, ग्रंथालय शा
दा. क्र. ........ दि.



त्याची कीव करीत कृष्णानं सांगितलं: " तर मग ज्या प्रकारे तू युधिष्ठिराचा वध केलास, त्याच प्रकारे स्वत:चाही करून घे म्हणजे झालं."

" म्हणजे–तो कसा काय ?" अर्जुनानं न कळून विचारलं.

" आपल्या गुणांची आपणच वाखाणणी करणं म्हणजे आत्महत्या करण्यासमान आहे. तेव्हा आपल्या तोंडानं तू आपली स्तुती करून घेतलीस की तुझा वध तू केलास, असं होईल !"

–अशाप्रकारे कृष्णानं अर्जुनाच्या दोन्ही प्रतिज्ञांतून त्याची सुटका करून टाकली.

## ११ गंगाजन्म

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी या दिवशी मित्र सप्तमी हे व्रत करतात. सूर्यदेवतेची पूजा करावयाच्या या व्रतात गरीब व निराधार ब्राह्मणांना भोजन घालायचं असतं.

गंगा नदीचा जन्म या तिथीलाच झाला, असं मानलं जातं. त्याबद्दल कथा अशी आहे, की– गंगा विष्णूच्या चरणापासून मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीला उगम पावली आणि मग तिथून शंकराच्या माथ्यावर उतरली. त्यानंतर ती पृथ्वीतलावर अवतरली. या दिवशी शिवभक्त शिवलिंगाला गंगाजलानं स्नान घालतात.

## १२ कबीरवटाची कथा

गुजरातेत भडोच शहरानजीक कबीरवट म्हणून एक अतिशय जुना वटवृक्ष आहे. त्याची कथा अशी –

भडोच शहरात जीवा व तत्त्वा नावाचे दोघे भाऊ रहायचे. परमार्थ साधण्यासाठी कोणता 'गुरू करायचा, असा विचार त्यांना पडला. शेवटी त्यांनी ठरवलं, की ज्याच्या पायाच्या स्पर्शानं वठलेल्या वटवृक्षाला पालवी फुटेल, त्याला गुरू करायचं. संत कबीराच्या चरणतीर्थानं तसं या वटवृक्षाच्या बाबतीत घडून आलं, म्हणून याला कबीरवट म्हणतात.

दुसरी आख्यायिका अशी आहे, ती अशी–

कबीरानं दात घासताना चावून टाकलेल्या वडाच्या काटकीपासून हा वृक्ष उगवला.

या कथांत तथ्य असो वा नसो; हा वटवृक्ष पुरातन तसाच अतिशय विस्तीर्ण आहे. नर्मदेच्या पुरांनी याच्या विस्ताराचा काही भाग वाहून नेला आहे. फोर्ब्स या जुन्या संशोधकानं म्हटलं आहे–या वृक्षानं तब्बल तीन-चार एकर जागा व्यापली असून तो डोंगरासारखा उंच दिसला. सातेक हजार माणसं याच्या शाखाविस्ताराखाली बसू शकत.

सन १८१९ नंतर मात्र या वृक्षाची दुर्दशा झाली असून मधलं खोड तर जवळजवळ नष्ट झालं आहे. कबीराच्या मंदिरावरून त्या खोडाची खूण पटवावी लागते.

भाविक लोक या वृक्षाच्या दर्शनाला जात असतात. याच्याजवळ शुक्लतीर्थही आहे. मार्गशीर्ष महिन्यात या कबीरवटाची यात्रा भरते.

## १३ दत्तजयन्ती कथा

दत्त हा अत्री ऋषी व अनसूया यांचा पुत्र. अत्रीचा पुत्र म्हणून (दत्त + आत्रेय= ) दत्तात्रेय म्हणण्यात येऊ लागलं. मार्गशीर्ष चतुर्दशीला दत्तजयन्ती मानण्यात येते.

अत्री ऋषीची पत्नी अनसूया ही महासती असल्याची वाखाणणी नारदानं एकदा स्वर्गलोकात केली. ती ऐकून ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्या पत्नी अनुक्रमे सावित्री, रमा व उमा यांना तिची असूया वाटू लागली. तिचं सत्त्वहरण करायचं त्यांनी ठरवलं, आणि त्यासाठी आपल्या पतींना त्यांनी अतिथीवेषात तिच्याकडं जायला सांगितलं. अत्रीच्या आश्रमात ते गेले, तेव्हा अत्री तिथं नव्हता. अतिथी म्हणून अनसूयेनं त्यांचं स्वागत केलं. भोजन करण्याची विनंती केली. पण देव तिचं सत्त्वहरण करायला आले होते. त्यांनी तिला अट घातली– "तू विवस्त्र होऊन जेवण वाढायचंस, तर आम्ही भोजन करू." अतिथींना तसंच जाऊ दिल्यास दूषण लागणार होतं. म्हणून आपलं सतीत्व पणाला लावण्याचं मनाशी ठरवून त्यांची अट तिनं मान्य केली. ते जेवायला बसताच तिनं पतीचं–अत्री ऋषीचं स्मरण केलं आणि त्या तिघांवर तीर्थ शिंपडलं. त्यासरशी त्या तिघांचं रूपांतर लहान बालकांत झालं. मग विवस्त्र होऊन आईच्या मायेनं तिनं त्यांना अन्नाचे घास भरवले.

आपल्या पतींची वाट पाहून सावित्री, रमा व उमा त्यांना शोधत अत्रीच्या आश्रमात येऊन ठेपल्या, तर अनसूयेनं आपल्या सतीत्वाचा प्रभाव पाडून आपल्या पतींची बालकं बनवल्याचं त्यांना आढळून आलं. तो अद्‌भुत प्रकार पाहून पश्चात्तापानं त्या व्याकुळ झाल्या. त्यांची दया येऊन अनसूयेनं मग त्या देवांना त्यांच्या पूर्वरूपात उभं केलं. अनसूयेनं दाखवलेल्या तिच्या सत्त्वाच्या साक्षात्कारानं देव तिच्यावर प्रसन्न झाले. तिच्या पोटी त्यांनी जन्म घ्यावा, ही तिची इच्छा त्यांनी मान्य केली. पुढं विष्णूच्या अंशानं दत्त, शिवाच्या अंशानं दुर्वास व ब्रह्मदेवाच्या अंशानं सोम (चंद्र) असे तीन मुलगे अनसूयेला झाले.

▭

# १४ यल्लम्माची कथा

दक्षिण भारतात यल्लम्मा नावाची ग्रामदेवता आहे. तिला हे नाव कसं पडलं ते पाहा– एकदा रेणुकादेवी कर्नाटकातल्या सौंदती गावी गेली असता तिच्या भक्तांनी तिला विचारलं: " यल्ल अम्मा ?"(यल्ल म्हणजे कोणीकडं व अम्मा म्हणजे आई) तर यावरूनच तिला यल्लम्मा हे नाव पडलं.

यल्लम्मा म्हणजे रेणुकाच असून तिच्याबद्दलची एक दंतकथा अशी आहे–

रेणुका ही जमदग्नी ऋषींची पत्नी; परशुरामाची आई. एकदा तिच्या हातून काहीतरी आगळीक घडली आणि भडक माथ्याचे जमदग्नी भडकून उठले. त्यांच्या आज्ञेवरून परशुरामानं रेणुकेचा– आपल्या प्रत्यक्ष आईचा शिरच्छेद केला. हा शिरच्छेद करण्याच्या आड एक मांग स्त्री आली, तिचाही शिरच्छेद त्यानं केला. आपली आज्ञा पाळल्याबद्दल जमदग्नी ऋषी परशुरामावर प्रसन्न झाले. त्यांनी त्याला वर मागायला सांगितलं. आपल्या आईला व मधे आडवं आलेल्या त्या मांग स्त्रीला पुन्हा जिवंत करावं, असा वर त्यानं मागितला. त्याप्रमाणं जमदग्नींनी त्या दोघींना जिवन्त केलं. " त्यांची शिरं त्यांच्या धडांना जोड म्हणजे त्या जिवन्त होतील. " असं त्यांनी परशुरामाला सांगितलं. पण आपली आई पुन्हा जिवन्त होतेय्, या आनंदाच्या भरात उतावळीनं त्यानं त्यांची शिरं धडांना जोडताना गफलत केली. म्हणजे रेणुकेचं शिर मांग स्त्रीच्या धडावर ठेवलं गेलं, तर मांगीणीचं शिर रेणुकेच्या धडावर जोडलं गेलं. मग अशा प्रकारे जिवन्त झालेल्या त्या दोघींना अनुक्रमे यल्लम्मा व मरिअम्मा अशी नावं पडली.

रेणुकेचं मुख्य स्थान आहे सौंदत्ती इथं. तिथले डोंगर 'यल्लम्माचे डोंगर' म्हणून ओळखले जातात. त्यांतल्या एका डोंगरावर, सरस्वती नदी आहे. तिच्या काठावर देवीचं देऊळ आहे. मार्गशीर्षात (व चैत्रातही) पौर्णिमेला इथं मोठी जत्रा भरते.

## १५ चाफ्याची कहाणी


'फुलांत फूल चाफ्याचं' असं गौरवानं म्हटलं जातं. या चाफ्याच्या फुलाच्या उत्पत्तीची एक कथा अशी आहे–

शिवानं आपला तिसरा डोळा उघडून त्यातल्या ज्वालामय ज्योतीनं कामदेवाला भस्म केलं, तर त्यावेळी त्याच्या धनुष्याचे तुकडे जिथं जिथं विखरून पडले, तिथं तिथं एकेक पुष्पवृक्ष उगवला. धनुष्याची मूठ रुक्ममण्याची होती. ती ज्या जागी पडली, तिथं उगवला चंपकवृक्ष.

बंगालमधे दुसरी एक लोककथा आहे, ती अशी–

एका राजाला चार राण्या होत्या. त्यांच्यातल्या कुणालाही बरेच दिवस मूलबाळ झालं नव्हतं, पण मग पट्टराणी गरोदर राहिली. तिला मूल होऊन ती राजाची सर्वांत जास्त आवडती राणी बनेल व बाकींच्याकडं राजा दुर्लक्ष करील अशी भीती इतर तीन राण्यांना वाटू लागली. अर्थात त्या पट्टराणीचा द्वेष करू लागल्या. मग त्यांनी पट्टराणीविरुद्ध डाव रचला. बाळंत होताना ती बेशुद्ध झाली असता, तिला झालेला मुलगा गुपचूप पळवून तो त्यांनी राजवाड्याच्या बागेत पुरून टाकला आणि मुलाच्या जागी एक दगड तिच्या कुशीत नेऊन ठेवला. तिला मुलाऐवजी दगड झाल्याचं त्यांनी राजाला सांगितलं. त्यानंतर पट्टराणीला एकेक असे आणखी सहा मुलगे झाले. त्यांचीही गत त्या तिघी सवतींनी पहिल्यासारखीच केली. आठव्या वेळी पट्टराणीला मुलगी झाली. तर पुन्हा तसाच प्रकार घडला. सतत आठ वेळा पट्टराणी बाळंत होऊन तिला मूल झालं नाही, हे पाहून ती अपेशी आहे, असा राजाचा समज झाला आणि म्हणून त्यानं तिला राजवाड्याबाहेर काढून बागेतल्या एका झोपडीत तिची रवानगी केली.

बागेत सात मुलगे जिथं पुरले होते, तिथं चाफ्याची सात रोपं उगवली. तर मुलगी पुरली होती, त्या जागी पारुल नावाच्या झाडाचं रोप उगवलं. रोपांचे वृक्ष होऊन त्यांना फुलं फुलली. मौज अशी की या झाडांची फुलं खुडायला त्या मुलांची आई येई, तेव्हा ती झाडं तिला फुलं खुडता यावीत म्हणून आपोआप खाली वाकत. मात्र बाकीच्या तीन



राण्या फुलं तोडायला येत, तेव्हा त्यांना फुलं मिळू नयेत म्हणून ती झाडे आपल्या फांद्या उंचावर नेत.

राजाच्या कानावर ही गोष्ट गेली, तेव्हा त्याला मोठे अजब वाटले. काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी एकदा खुद्द राजा त्या झाडाजवळ गेला. तेव्हा त्या झाडांना चक्क वाचा फुटली आणि त्यांनी राजाला तीन राण्यांचे क्रूर कपट सांगितले. राजाने लगेच ती सगळी झाडे उपटायला लावली व त्यांच्याखालचे खड्डे उकरले. त्यांच्यातून सात गोंडस मुलगे व एक गोजिरवाणी मुलगी बाहेर निघाली. त्यांना पाहून राजाला हर्ष झाला, पण त्याचबरोबर त्या तीन कपटी राण्यांचा संताप आला. झोपडीत घालवून दिलेल्या पट्टराणीला त्यानं परत राजवाड्यात आणलं आणि इतर तीन राण्यांना राजवाड्यातून हाकलून दिले.

## १६ भृगुतीर्थाची कथा

नर्मदेच्या तीरावरील भेडाघाट इथं एका धबधब्याजवळ भृगुतीर्थ हे प्राचीन स्थान आहे.

पूर्वीच्या काळी भृगूऋषी इथे तप करीत बसले होते. तर दीर्घकाळ अखंड स्थिर बसून राहिल्याने त्यांचा देह वारुळाने झाकळून गेला. एवढा काळ तप केल्याने तरी त्यांचा क्रोध शमला की नाही, याची परीक्षा घेण्याचे शंकराने ठरवले. ते वारूळ मोडून टाकायला त्याने नंदीला सांगितले. नंदीने तसे करताच भृगू कोपला आणि त्याने नंदीला शाप दिला, पण मग विचाराअंती त्याच्या ध्यानी आले की, शंकराच्या सांगण्यावरूनच नंदीने वारूळ नष्ट केले असले पाहिजे. ही जाणीव होताच त्याला आपल्या करणीचा पश्चात्ताप झाला आणि त्याने 'करुणाभ्युदय' हे स्तोत्र रचून शंकराची करुणा भाकली. तेव्हा शंकर त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याने भृगूला वर दिला की, इथे तुझ्या नावाने तीर्थस्थान उदय पावेल.

रामचंद्राने परशुरामाचा गर्वहरण करून त्याचे तपःसामर्थ्य नष्ट केले, तेव्हा परशुरामाने ते सामर्थ्य पुन्हा मिळवण्यासाठी इथे बसूनच तप केले. □

---

## १७ मंगलेश्वराची कथा

उज्जयिनी इथे क्षिप्रा नदीच्या काठावर मंगलेश्वर नावाचे शिवस्थान आहे. मंगळ ग्रहाचं हे जन्मस्थान असल्याचं मानतात. या स्थानाबद्दलची कथा अशी–

वीरमंगल नावाचा एक राजज्योतिषी होता. केवळ दूध पिऊन तो सतत सात वर्षं ज्ञानदेवाच्या भेटीची वाट पाहत बसला होता. उत्तरेच्या. तीर्थयात्रेत फिरत फिरत एकदा ज्ञानदेव इथं येऊन पोचले. त्यावेळी वीरमंगलाच्या इच्छेला मान देऊन ते एक दिवस त्याच्या घरीही राहिले त्यानं भक्तिभावानं ज्ञानदेवांचा आदरसत्कार केला आणि शेवटी त्यांच्या पायी आपला देह समर्पण केला. तेव्हा ज्ञानदेवांनी स्वतः त्याला इथं समाधी दिली आणि त्याजागी शिवलिंग स्थापन केलं. तेच हे मंगलेश्वराचं स्थान.


# १८ अश्वत्थवृक्षाचा महिमा

अश्वत्थ म्हणजे पिंपळ. याला वृक्षांचा राजा असं म्हटलं आहे. 'तैत्तिरीय ब्राह्मण' या ग्रंथात अश्वत्थवृक्षाची उपपत्ती दिली आहे ती अशी– एकदा अग्नी देवांपासून निघाला व त्यानं अश्वरूप धारण केलं. या स्वरूपात तो वर्षभर पिंपळवृक्षावर राहिला, म्हणून त्याला अश्वत्थ नाव पडलं.

गौतमबुद्धाला अश्वत्थवृक्षाखाली बोधी (दिव्यज्ञान) लाभल्यानं बौद्ध लोक याला बुद्धाचं प्रतीक मानतात. श्रीकृष्णानं गीतेत "सर्व वृक्षांमध्ये मी अश्वत्थ आहे." असं सांगून त्याचा गौरव केला आहे. पद्मपुराणात अश्वत्थाच्या महात्म्याची एक कथा दिलेली आहे, ती अशी–

धनंजय नावाचा एक ब्राह्मण विष्णुभक्त होता. त्याची सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठी विष्णूनं त्याला दरिद्री केलं. थंडीच्या दिवसांत तो शेकोटी पेटवून थंडीपासून स्वतःचा बचाव करी. शेकोटीसाठी लाकडं हवीत म्हणून एकदा त्यानं पिंपळाची फांदी तोडली. तेव्हा विष्णू प्रकट होऊन त्याला म्हणाला– "पिंपळात मी वास करीत असल्यानं त्याच्यावर तू घातलेल्या कुऱ्हाडीच्या घावांनी मी जखमी झालो आहे."

हे ऐकून ब्राह्मणाला एवढं दारूण दुःख झालं की, त्या दुःखाच्या आवेगासरशी, हातातल्या कुऱ्हाडीनं तो स्वतःची मान कापायला सरसावला. तेव्हा विष्णू त्याच्यावर प्रसन्न होऊन म्हणाला, "यापुढं तू नित्यनेमानं अश्वत्थाची पूजा कर." त्या दिवसापासून ब्राह्मण अश्वत्थ-पूजा करू लागला. त्यामुळं त्याचं दारिद्र्य नाहीसं झालं.



# १९ मोरया गोसावी

पुण्याजवळच्या चिंचवड गावी, पवनानदीच्या काठी थोर गणपती-भक्त मोरया गोसावी या साधूची समाधी आहे. त्याचे चिरंजीव चिंतामणी यांनी वडिलांच्या समाधीवर, १७ व्या शतकाच्या मध्याला मंदिर उभारलं आहे.

लहानपणी वेदांचं अध्ययन पूर्ण झाल्यावर सद्गुरू सिद्ध योगिराज याच्या उपदेशावरून मोरया गोसावींनी थेऊर इथं तप केलं. बेचाळीस दिवसांच्या अखंड नामस्मरणानंतर गणपतीनं त्यांना दृष्टांत दिला. मग मोरगावी परतून त्यांनी लोकसेवा आरंभली. म्हाताऱ्या आई-बापांच्या निधनानंतर ते चिंचवडला येऊन राहिले.

प्रत्येक चतुर्थीस ते मोरगावला जाऊन तिथल्या गणपतीचं दर्शन घेत. पुढं त्यांचं वय झालं, तेव्हा त्या गणपतीनं त्यांना स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितलं– "तू आता एवढ्या दूरवरची पायपीट करीत जाऊ नकोस. मी कऱ्हा नदीत आहे. तिथून बाहेर काढून तू मला तुझ्या घरी घेऊन जा."

दृष्टांताप्रमाणे कऱ्हा नदीत एकेजागी मोरयांना गणेशमूर्ती सापडली. ती नेऊन त्यांनी आपल्या घरी स्थापली. हळूहळू त्यांच्या साधुत्वाचा बोलबाला वाढत गेला. लांबलांबचे लोक येऊन त्यांचं दर्शन घेऊ लागले. चिंचवडचं गणेशस्थान भक्तभाविकांचं तीर्थस्थान बनलं. वयाच्या ८६ व्या वर्षी, मार्गशीर्ष वद्य षष्ठी, शके १३८३ रोजी चिंचवडलाच मोरयांनी जिवंत समाधी घेतली. या तिथीला दरवर्षी चिंचवड इथं त्यांच्या पुण्य-तिथीचा उत्सव होतो. या उत्सवाला येणाऱ्यांना प्रसादभोजन देण्याची प्रथा आहे.

## २० अजातशत्रू

देवदत्ताच्या चिथावणीने राज्य मिळविण्यासाठी अजातशत्रूने बिंबिसारचा वध करण्याचे ठरविले. परंतु अचानक बिंबिसार जागा झाल्यामुळे तो बेत फसला. परंतु बिंबिसाराने मोठ्या मनाने अजातशत्रूस गादीवर बसविले व अजातशत्रू पित्याच्या आज्ञेप्रमाणे वागू लागला.

देवदत्ताने नको म्हणून सांगितले असूनही बुद्धाचा उपदेश ऐकून बौद्ध व जैन दोघांचा आदर करू लागला.

अजातशत्रूत झालेला तो बदल पाहून देवदत्ताचा आशाभंग झाला व त्याने स्वतःच बुद्धाचा वध करण्याचे ठरविले. बुद्ध दररोज संध्याकाळी एका पर्वताच्या पायथ्याशी हिंडत असे. देवदत्ताने त्या डोंगराच्या शिखरावर जाऊन एक मोठा दगड बुद्धावर घरंगळत सोडला.

त्याच वेळी आणखी एक दगड घरंगळत खाली जात असता देवदत्ताने ढकललेल्या दगडाआड आला व त्याच्याशी टक्कर होऊन दुसऱ्या बाजूला गेला. दोन्ही दगड बुद्ध ध्यान धरून बसला होता तेथून पुष्कळ दूर जाऊन पडले तरी बुद्धाच्या पायाला एक दगड लागलाच.

नंतर देवदत्ताने निलगिरी नावाच्या हत्तीच्या माहुताबरोबर कट केला. त्या हत्तीला माणसांना चिरडून जाण्याची सवय होती. त्यांनी हत्तीला खूप दारू पाजली. बुद्ध त्या वाटेने येण्यापूर्वीच त्यांनी हे काम केले होते.

हत्तीला दारू खूप चढल्यावर त्यांनी त्याला रस्त्यावर सोडले. हत्तीला पाहून लोकांची पळापळ सुरू झाली. त्याच वेळी बुद्ध आपल्या शिष्यांसह येत होता. शिष्य बुद्धाचे रक्षण करण्यासाठी पुढे येऊ लागले. परंतु बुद्ध त्यांना मागे सारून स्वतःच पुढे आला.

त्या गडबडीत एका बाईच्या कडेवरचे मूल सरकून जमिनीवर पडले. हत्ती त्याच्या अगदी जवळ आला. पळणारे लोक मुलगा हत्तीच्या पायाखाली तुडविला जाणार म्हणून ओरडू लागले.

बुद्ध वेगाने चालत पुढे आला आणि मुलाच्या व हत्तीच्या मधे येऊन उभा राहिला. त्याच वेळी हत्ती तेथे आला. मदोन्मत्त हत्ती बुद्धाला व

मुलाला दोघांना ठार करणार असे लोकांना वाटले. परंतु आश्चर्य म्हणजे हत्ती जागच्या जागी थांबला.

बुद्ध हत्तीला म्हणाला– "निलगिरी ! शांत हो, सौम्य हो !" हत्ती शांत होऊन बुद्धासमोर गुडघे टेकून त्याचे जणू आशीर्वाद मागू लागला. बुद्धाने जवळ जाऊन प्रेमाने त्याच्या अंगावर हात फिरविला. लोकांना हा अनुभव अगदी नवा होता. बुद्ध किती थोर महापुरुष आहे, हे त्यांना त्या वेळी कळले.

## २१ चतुर प्रधान

जुन्या काळची गोष्ट. चीनच्या एका बादशहाच्या मोतद्दाराच्या चुकीमुळं बादशहाचा एक घोडा मरण पावला. त्यामुळं बादशहा एवढा संतापला की, त्याचा शिरच्छेद करण्यासाठी लगेच तलवार उपसून तो त्याच्या अंगावर धावला. त्यावेळी बादशहाचा प्रधान तिथंच होता, तो बादशहाला म्हणाला, "तुम्ही त्याला शासन करताहात खरं; पण ते कशाबद्दल हे आधी त्याला कळू द्या." त्यावर बादशहा प्रधानाला म्हणाला, "तर मग तुम्हीच सांगा त्याला त्याच्या कोणत्या अपराधाबद्दल मी शिक्षा करतोय ते."

तेव्हा प्रधान मोतद्दारास म्हणाला, "मूर्खा, तू किती अपराध केलेयस याची कल्पना आहे का तुला ? एकतर तू खाविंदांचा घोडा मारलास. दुसरं असं की, त्यांच्या हातून तू बळी जाणार, म्हणजे... घोड्यापायी बादशहानं चक्क माणूस मारला, अशी त्यांची निंदा व्हायला तू कारणीभूत होतोयस !"

प्रधानाचे हे उद्गार ऐकताच बादशहा उमजला. आपण केवळ आततायीपणानं मोतद्दाराच्या प्राणावर उठलो असल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि मोतद्दाराचा शिरच्छेद करण्याचा बेत त्यानं सोडून दिला.

## २२ इसापची कसोटी

नीतिकथांचा कर्ता इसाप एकदा रस्त्यानं चालला असताना वाटेत त्याला एक वाटसरू भेटला. त्यानं इसापला विचारलं, " काय हो, ही समोर दिसतेय ती टेकडी ओलांडून जायला कितीसा वेळ लागेल मला?"

इसाप बोलला, " तुम्ही चालू लागा तर खरं; मग खात्रीनं ओलांडून जाल तुम्ही ती टेकडी."

या उत्तरानं वैतागून वाटसरू उद्गारला, " वा, राव ! चालत राहून मी ती ओलांडीन हे उघडच आहे, पण ती ओलांडून जायला मला किती वेळ लागेल, ते विचारतोय मी."

" तुम्ही चालायला लागा तर खरे !" इसाप शांतपणे बोलला.


" विक्षिप्त दिसतो हा माणूस ! याच्याकडून कसली माहिती मिळायला !" असं वैतागून स्वतःशीच उद्गारत तो वाटसरू झपाझप चालू लागला.

तो थोडा वेळ चालून गेल्यावर इसापनं हाका मारून त्याला थांबवलं. तेव्हा वैतागून त्यानं विचारलं, " आता काय हवं तुला ?"

" मला काहीही नकोय !" इसाप बोलला. " मला एवढंच सांगायचंय की, तुम्ही ती टेकडी दीडेक तासात ओलांडून जाल."

" अरे, पण तू ही गोष्ट मला मघाच का नाही सांगितलीस ?" वाटसरूनं नवल करीत विचारलं.

" तुम्ही किती वेगानं चालत जाणार हे मला पाहायचं होतं ! आता तुमच्या चालण्यावरून कल्पना आली."



## २३ लोभी राजाची परीक्षा

एक राजा होता. तो भारी लोभी होता. एके दिवशी त्याचा प्रधान त्याला अतिशय चिंताग्रस्त झालेला दिसला म्हणून त्यानं विचारलं, "एवढी कसली चिंता पडलीय, प्रधानजी ?"

प्रधान खिन्नपणे उद्गारला, "मी लौकरच मरणार असं भाकीत एका ज्योतिषानं सांगितलंय मला. तेव्हा मी मेल्यावर माझ्या मागं माझ्या कुटुंबाचं कसं निभावणार, अशी चिंता पडलीय मला."

"काहीएक काळजी करू नका, प्रधानजी." राजा वरपांगी त्याला दिलासा देत म्हणाला, "तुमच्या मागं तुमच्या साऱ्या कुटुंबाची व्यवस्था मी पाहीन."

बाह्यत: प्रधानाला दिलासा दिला, तरी त्याचं मरण लौकर ओढवणार म्हणून मनातून राजाला आनंदच झाला होता. कारण प्रधानानं मुबलक द्रव्य साठवलेलं आहे हे त्याला माहीत होतं. अर्थात प्रधान मेल्यावर आपल्याला ते लुबाडता येईल, असा त्याचा बेत होता.

त्यानंतर दोनच दिवसांनी प्रधान आजारी पडल्याची वार्ता राजाच्या कानी आली. तिसऱ्या दिवशी कळलं की, त्याची प्रकृती अत्यवस्थ आहे आणि चौथ्या दिवशी तर प्रधान मरण पावल्याची बातमी आली.

प्रधान मेल्यामुळं त्याच्या घरची सर्व मंडळी शोकग्रस्त होऊन बसलेली असतील, या समजुतीनं राजानं ती संधी साधण्याचं ठरवलं. आपले दोन नोकर त्यानं प्रधानाच्या घरी, त्याची द्रव्याची पेटी आणायला पाठवले. प्रधानाच्या घरची माणसं शोकग्रस्त दिसली. राजाचे नोकर ती पेटी घेऊन गेले, याकडं कुणी लक्षच दिलं नाही.

नोकरांनी पेटी राजवाड्यावर आणल्यावर राजानं नोकरांना बाहेर घालवलं आणि आपल्या महालाचं दार आतून बंद करून घेतलं. मग त्या पेटीत केवढी संपत्ती आहे हे पाहण्यासाठी उतावळीनं त्यानं ती पेटी उघडली. तर तीत खुद्द प्रधान धडधाकट अवस्थेत बसलेला आढळला.

हा प्रकार पाहून राजा चक्रावून गेला. काही क्षण तो अवाक्



होऊन बघतच राहिला. मग भानावर येऊन अचंब्यानं त्यानं विचारलं, " प्रधानजी, तुम्ही मेला होतात ना ?"

" होय ! मी मरणारच होतो. " प्रधान राजाकडं खोचक नजरेनं पाहत उद्गारला, " पण त्यापूर्वी आपण माझ्या पश्चात माझ्या कुटुंबियांची कशीकाय व्यवस्था पाहता, हे अजमावून पाहण्याचं ठरवलं मी. पण माझ्या मरणानंतर माझ्या कुटुंबाला तुम्ही बेधडक भीक मागायला लावणार याची आत्ता प्रचीती आली. त्यामुळं मरण्याचा बेत तूर्त रहित केलाय मी. "

प्रधानाच्या या उद्गारांनी राजा पुरता ओशाळला. शरमेनं त्यानं मान खाली घातली आणि प्रधानाची क्षमा मागितली. या घटनेनं आपल्या लोभीपणाचा राजाला खूप पश्चात्ताप झाला. त्यानं आपली लोभी वृत्ती सोडून दिली.

## २४ रसिक चोर

एक फ्रेंच कादंबरीकार एका रात्री घराबाहेर असताना रात्री घरात एक चोर शिरला. तो खिडकीतून आत शिरला तो थेट कादंबरीकाराच्या लिहायच्या खोलीत. चोरानं लिहायच्या टेबलावरचा छोटा दिवा (टेबल-लँप) लावला आणि जवळपास चोरण्यासारखी वस्तू धुंडाळू लागला. तर टेबलावर त्याला एका कादंबरीची लेखीप्रत ठेवलेली दिसली. कादंबरी-वाचनाची त्या चोराला आवड होती. म्हणून कुतूहलानं त्यानं ती कादंबरी सहज म्हणून वाचायला सुरुवात केली, तर त्या कादंबरीचं कथानक त्याला एवढं आवडलं की, ती वाचण्यात तो रंगून गेला. त्याला दुसरं कसलंच भान राहिलं नाही. बाहेर कुठंतरी कोंबडयानं बांग दिली, तेव्हा त्या आरवण्यानं तो दचकून भानावर आला. पहाट होत आल्यानं आता त्या घरातून पसार होणं भाग होतं, पण कादंबरी अजून पुरी वाचून झालेली नव्हती बरीचशी वाचायची उरली होती. तिच्या कथानकानं त्याच्या मनाची एवढी पकड घेतली होती की, ती पूर्ण वाचायचा मोह त्याला आवरेना. आता काय करायचं ? अखेर त्यानं निर्णय घेतला की, ती कादंबरीच चोरून न्यायची आणि त्या घरातलं दुसरं-तिसरं काहीही न चोरता, कादंबरीचं ते हस्तलिखित तेवढं बरोबर घेऊन तो चोर, आला तसा खिडकीतून पसार झाला.

दुसऱ्या दिवशी त्या कादंबरीकाराला एक पत्र आलं, ते असं—

" काल रात्री आपण घरी नाहीसे पाहून आपल्या घरी मी चोरी करायला म्हणून शिरलो होतो. तेव्हा आपल्या नव्या कादंबरीची लेखी प्रत मला टेबलावर दिसली. सहज म्हणून वाचायला घेतली, तर कथानक रंगत गेलेलं आढळलं. त्यानं चटका लावला. कादंबरी बरीच मोठी असल्यानं रातोरात तिथल्या तिथं ती वाचून संपवणं शक्य नव्हतं. म्हणून शेवटी घरातलं दुसरं काहीएक न चोरता फक्त आपली कादंबरी घेऊन आलो, पण आपण बिलकुल काळजी करू नका. वाचून झाल्यानंतर आपली कादंबरी आपल्याला बिनबोभाट पोचती करतो. "

आणि पत्रात आश्वासन दिल्याप्रमाणे कादंबरीचं हस्तलिखित

कादंबरीकाराला परत मिळालं.

—या शतकाच्या प्रारंभी एका फ्रेंच कादंबरीकारानं स्वतःच्या अनुभवाची ही गोष्ट प्रसिद्ध केली आहे.

## २५ लक्ष्मीव्रताची कथा

प्रत्येक पंचमीला उपवास करून लक्ष्मीची पूजा करून लक्ष्मीव्रत करतात. हे वर्षभर करायचं असतं. या व्रताची कथा अशी—

पूर्वी सौराष्ट्रात भद्रश्रवा म्हणून राजा होता. सुरतचंद्रिका या राणीपासून त्याला सात पुत्र व एक कन्या झाली होती. या राजाच्या राजवाड्यात एकदा देवी लक्ष्मी म्हाताऱ्या ब्राह्मणीचं रूप घेऊन गेली. राणीच्या महालावरच्या पहारेकरी दासीनं तिला अडवलं. आपल्याला राणीला भेटायचं असल्याचं सांगून ब्राह्मणी म्हणाली : "गेल्या जन्मी केलेल्या लक्ष्मीव्रतामुळं राणीला आताचं वैभव लाभलंय. पण या जन्मी ती हे व्रत विसरून गेलीय. त्याची आठवण द्यायला आलेय मी." राणी तिला भेटली; पण तिचं काही ऐकून न घेता राणीनं तिला अपशब्द बोलून मारपीट करून हाकलून दिलं.

ब्राह्मणी रडत निघून जाऊ लागली. राजकन्या श्यामबाला हिनं तिला मधेच अडवलं व सारी हकीगत तिच्याकडून समजून घेतली. मग लक्ष्मीव्रताचा विधी तिच्याकडून जाणून घेतला. नंतर सतत चार गुरुवारी तिनं हे व्रत केलं. तिच्यावर लक्ष्मी प्रसन्न झाली. त्यामुळं मालाधर या राजपुत्राशी तिचं लग्न होण्याचा योग जुळून आला.

राणीच्या आततायीपणापायी भद्रश्रव्याचं वैभव ओसरलं. दारिद्र्य ओढवलं. द्रव्याची याचना करण्यासाठी तो मुलीकडं गेला. तिनं त्याला भरपूर द्रव्य देऊन निरोप दिला. पण ते द्रव्य त्याला लाभलं नाही. कारण तो घरी परतल्यावर पाहतो, तर त्याचे चक्क कोळसे झालेले. मग स्वतः सुरतचन्द्रिका मुलीकडं गेली. मुलीचा तो लक्ष्मी-

व्रताचा दिवस होता. तर मुलीनं आपल्याबरोबर आईलाही ते व्रत करायला लावलं.

त्या व्रताचं फळ तिला पूर्वीचं वैभव मिळालं.

## २६ वासुकिनाथ ज्योतिर्लिंगाची कथा

बिहारात वैद्यनाथ (देवघर) या गावाजवळ वासुकिनाथ हे शिवक्षेत्र आहे. बारा ज्योतिर्लिंगांतले हे नागेश ज्योतिर्लिंग असल्याचं काही लोक मानतात.

प्राचीन काळी सुप्रिय नावाचा वैश्य शिवभक्त होता. तो तप करीत बसला असता, दारूक दैत्य त्याला ठार मारण्यासाठी त्याच्यावर चालून गेला. तत्काळ शंकर आपल्या भक्ताच्या रक्षणासाठी धावून आला. त्यानं दारूकाचा वध केला व सुप्रियाला वाचवलं. शंकरानं तिथंच रहावं अशी सुप्रियानं प्रार्थना केली. तेव्हा ज्योतिर्लिंगाच्या रूपात शंकर तिथं वास्तव्य करू लागला.

पुढं या ठिकाणी अरण्य माजलं आणि त्यात हे ज्योतिर्लिंग गडप झालं. लोकांना त्याचा पार विसर पडला. मग एका वर्षी दुष्काळ पडल्यामुळं धान्याची टंचाई झाली. त्यामुळं कंदमुळं खाऊन गुजराण करावी या हेतूनं काही लोक दारूका वनात गेले. त्यांच्यातला वासू नावाच्या माणसाची कुदळ जमिनीत खणताना ज्योतिर्लिंगावर आदळली. तर त्या घावानं लिंगातून रक्ताची धार निघाली ती पाहून वासू भयभीत झाला. तेवढ्यात शिवाची आकाशवाणी झाली : " घाबरू नकोस. लिंगाची नीट देखभाल कर म्हणजे झालं. " त्याप्रमाणं वासूनं ती जागा नीट साफ केली आणि लिंगाची पूजा केली. मग लिंगाची रोज पूजा करण्यासाठी म्हणून तो तिथंच राहिला. त्याच्या उपासनेवरून लोक मग त्या लिंगाला वासुकिनाथ म्हणू लागले.

या क्षेत्राच्या ईशान्येस वासुकी पर्वत आहे. समुद्रमंथनाची काम-

गिरी पार पडल्यावर वासुकी नागाला देवांनी या पर्वतावर सोडून दिलं. तर या वासुकीनं इथल्या शिवलिंगाची उपासना केली. म्हणून याला नागेश, नागेश्वर किंवा वासुकिनाथ असं नाव पडलं. अशीही कथा त्या भागात सांगतात.

## २७ भौमव्रताची कथा

मार्गशीर्ष महिन्यातल्या कोणत्याही मंगळवारी भौमव्रत सुरू करतात, आणि वर्षभर प्रत्येक मंगळवारी, किंवा संकल्प करावा तितक्या मंगळवारी हे व्रत चालवतात.

प्राचीन काळी सुनंद नावाच्या धर्मनिष्ठ ब्राह्मणाला सुनंदा नावाची बायको होती. ती भारी लोभी होती. मूलबाळ नव्हतं, म्हणून तिनं एक परकी मुलगी सांभाळली होती. नवल असं, की, पूर्वजन्मी या मुलीनं भौमव्रत केल्याच्या पुण्याईमुळं तिच्या सर्वांगातून सोनं वाहायचं. ती मोठी झाल्यावर तिचं लग्न करून देणं ब्राह्मणीला भाग पडलं. पण तिच्या अंगातून निघणाऱ्या सोन्याला आता मुकावं लागणार म्हणून तिच्या विषयीच्या मत्सरानं ब्राह्मणीचं मन भरून गेलं. आणि त्या बाईनं, मुलगी नवऱ्याबरोबर जाण्याच्या वेळेस संधी साधून त्याचा खून केला. तरीपण मुलगी बधली नाही. नवऱ्याबरोबर सती जाण्यासाठी त्याच्या चितेत उडी घ्यायला ती सरसावली. तेव्हा भौम तिच्यावर प्रसन्न होऊन म्हणाला : " मुली, अग्नीत उडी घेऊ नकोस. हवा तो वर मागून घे. " तिच्या मागणीप्रमाणं मग भौमानं तिच्या नवऱ्याला जिवन्त केलं.





म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
क्र. १७६९
विषय वा-वा

## २८ भ्रमरांबेची कथा

आंध्रप्रदेशात श्रीशैल पर्वतावर भ्रमरांबा (भ्रमर + अंबा) देवीचं स्थान आहे. 'सुंदरा' असं तिचं दुसरंही एक नाव आहे. आद्य शंकराचार्यांनी या भगवती मातेचं स्तुतिस्तोत्र रचलं आहे. या देवीबद्दलची कथा अशी आहे –

पार्वतीनं दुर्गेचं रूप घेऊन महिषासुराशी युद्ध आरंभलं. पण त्याचा पाडाव होता होईना. म्हणून दुर्गेनं असंख्य भ्रमरांचं–भुंग्यांचं रूप धारण केलं आणि त्याच्यावर तुटून पडून त्याचा संहार केला. महिषासुराचा नाश झाला खरा, पण त्याचं अपवित्र रक्त पृथ्वीभर सांडलेलं आहे, असं दुर्गेला आढळून आलं. श्रीशैल पर्वताला तेवढी त्याच्या रक्ताची बाधा झालेली नव्हती. हे पाहून देवी तिथंच कायमचं वास्तव्य करून राहिली.

प्रत्येक पौर्णिमेला श्रीशैलावर या देवीचं भ्रमण होत असतं, असं मानतात. त्यावरूनही भ्रमरांबा हे नाव पडल्याचं बोललं जातं.

## २९ मुंड्ला मुडम्माची कथा

दक्षिण भारतात मुंड्ला मुडम्मा नावाची ग्रामदेवता आहे.

मुंड्ला नावाची शूद्राची मुलगी होती. रानात जाऊन ती गुरं चारायची. ती एका जागी बसायची आणि गुरं दूरवर कुठंतरी चरत राहायची. संध्याकाळी घरी परतताना असा काही आवाज काढून गुरांना बोलवायची की, कुठंही असली, तरी सारी गुरं सुरळीत तिच्या मागं यायची. तिच्यातली ही विशिष्ट शक्ती गावच्या लोकांच्या लक्षात आली, तेव्हा ते धास्तावले. म्हणून तिच्या या शक्तीला काहीतरी मर्यादा घालायला त्यांनी एका मांत्रिकाला सांगितलं. तेव्हा ठराविक जागेच्या बाहेर मुंड्ला हिला जाता येऊ नये या दृष्टीनं मांत्रिकानं काहीतरी कवटाळ केलं.

ही वार्ता कळल्याबरोबर मुंड्ला अचानक नाहीशी झाली. मग काही दिवसांनंतर, ज्या कुरणात ती गुरं चारताना बसायची तिथं एक मोठाला दगड, उगवल्यासारखा उत्पन्न झालेला दिसला, तिच्या अदृश्य होण्यामुळं चकित झालेल्या गावकऱ्यांना वाटलं, की त्या दगडाच्या रूपानं मुंड्लाच तिथं येऊन ठाकलीय. तिच्याबद्दल त्यांना आता एवढं अप्रूप वाटू लागलं की, त्यांनी त्या दगडातून एक स्त्रीमूर्ती कोरून घेतली. मग त्या ठिकाणी एक मंदिर उभारलं.

म्हणजे मुंड्ला ही देवी बनली. पुढं या मंदिराभोवती गाव वसलं. ते अर्थात्‌च तिच्याच नावानं ओळखलं जाऊ लागलं. या देवतेची यात्रा तब्बल नऊ दिवस चालते.

## ३० रविनारायण

ओरिसात स्त्रियांचं रविनारायणव्रत प्रचलित आहे. रविवारी येणाऱ्या एकादशीच्या दिवशी हे व्रत करतात.

सौराष्ट्रात एक श्रीमंत व्यापारी होता. त्याच्या घरी एकदा एक धर्मनिष्ठ ब्राह्मण आला. व्यापाऱ्याच्या मुलीनं व सुनेनं त्याला भरपूर धन अर्पण केलं. "परमेश्वर तुझं कल्याण करील," असा आशीर्वाद ब्राह्मणानं सुनेला दिला. पण मुलीला मात्र त्यानं सांगितलं– "तुझ्या नशिबात सौख्य नाही." ते ऐकून मुलीच्या आईला दुःख झालं. "असं का ?" म्हणून तिनं विचारलं. तेव्हा ब्राह्मणानं सांगितलं– "या मुलीच्या झोपायच्या जागी खणून पाहिलंत की कारण कळून येईल."

ब्राह्मण निघून गेल्यावर ती जमीन खणून पाहिली, तर सापडलं एक फुटकं मडकं व केरसुणी. यावरून मुलीच्या आईला काही अर्थबोध होईना. जवळच एक धार्मिक वृत्तीची कुंभारीण राहायची. रविनारायणासारखं व्रतही करायची. मुलीच्या आईनं तिलाही जाऊन विचारलं. पण तिलाही त्या वस्तूंवरून काही बोध होईना.

पुढं मुलीचं लग्न झालं. त्या दिवशी रात्री मात्र ती कुंभारीण

वधूवरांच्या खोलीबाहेर पहारा करीत बसली. रात्री कधीतरी वराचे प्राण घेऊन जायला यम आला. त्यावेळी तिनं त्याला अडवून धरलं. साहजिकच वराच्या मरणाची वेळ टळली. तेव्हा क्रुद्ध होऊन यमानं त्या कुंभारणीची सात मुलं व नवरा यांचे प्राण घेतले. पण रविनारायणाचं व्रत करणाऱ्या कुंभारणीनं सकाळी घरी गेल्यावर सूर्याची प्रार्थना केली. तेव्हा ती सारीजणं पुन्हा जिवंत झाली.

## ३१ यात्रकळी

केरळात नंपूतिरी ब्राह्मण यात्रकळी नावाचं नृत्यनाटच करतात. हे ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न असतात. आठव्या शतकानंतर हे नृत्यनाटच उदयाला आलं. त्याच्या उदयाची गोष्ट अशी आहे—

पेरुमाळ राजाच्या दरबारात एके दिवशी काही विद्वान बौद्ध हजर झाले. दरबारातल्या हिंदू पंडितांना त्यांनी वादाचं आव्हान दिलं. वादाची अट अशी ठरली : हिंदू हरले, तर त्यांनी बौद्धधर्म स्वीकारावा. आणि बौद्ध हरले, तर त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात यावं.

राजाच्या साक्षीनं वाद सुरू झाला· त्यात बौद्धांची सरशी होऊ लागली. हिंदू पंडितांची डाळ शिजेना. एकेकजण वादाच्या रिंगणातून माघार घेऊ लागला. शेवटी, पराभूत ठरलेले ते पंडित तुक्कारियूर या शिवक्षेत्रात गेले आणि तिथं त्यांनी देवाला साकडं घातलं. सतत ४१ दिवस ते धरणं धरून बसले. मग अचानक एक तेजस्वी ब्राह्मण देवालयात आला. त्यानं त्या ब्राह्मण पंडितांना एक मंत्र सांगितला व त्या मंत्रासह दिव्याला प्रदक्षिणा घालण्याचा सल्ला दिला. पंडितांनी त्या प्रमाणं केलं. त्याचं फळही तत्काल दिसून आलं.

आणि सहा वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण पुन्हा पेरुमाळ राजाच्या राज्यात हजर झाले. त्या बौद्ध आचार्यांना त्यांनी पुन्हा वादाचं आव्हान दिलं. वाद सुरू झाला; आणि नवल असं की, या वेळी बौद्ध आचार्य सपशेल हरले. खाली माना घालून दरबारातून मुकाट निघून गेले. केरळी

पंडितांची अब्रू अखेर वाचली होती.

तेव्हापासून भगवंताच्या कृपेचं साधन म्हणून हे नृत्यनाट्य प्रचलित झालं.

## ३२ मौनव्रताची कथा

प्राचीनकाळी, शाकल्य नगरात राहणाऱ्या सोमशर्मा या गरीब ब्राह्मणाला दोन मुली होत्या. एकीचं नाव होतं रूपवती, तर दुसरीचं नाव सुपर्णिका. त्या रोज गाई रानात चरायला न्यायच्या. एके दिवशी तळ्याजवळच्या शिवलिंगाची पूजा करीत असलेल्या देवांगना त्यांच्या नजरेस पडल्या. देवांगनांना विचारता त्या उतरल्या: "आम्ही मौनव्रत करीत आहोत." या मुलींनीही मग त्यांच्याबरोबर ते व्रत केलं. तळ्यात दहीभात टाकून, फळं नि लाडू घेऊन त्या घरी परतल्या. त्यांनी आणून ठेवलेले लाडू दुसऱ्या दिवशी सोन्याचे बनलेले आढळले. ते पाहून सोमशर्म्यानं मुलींकडं चौकशी केली. पूजेची हकीगत सांगून मुली म्हणाल्या: "शिवकृपेमुळं हे घडलंय." त्या दिवशी त्या मुली रानात गेल्या, तेव्हा एका राजाशी त्यांची गाठ पडली. तहानलेल्या त्या राजाला त्यांनी प्यायला पाणी दिलं, मग त्यांची माहिती विचारून राजा निघून गेला. नंतर रूपवतीला मागणी घालून राजानं तिच्याशी लग्न केलं. तर सुपर्णिकेचं लग्न सोमशर्म्यानं एका क्षत्रिय ब्राह्मणाशी करून दिलं.

पण राजवैभव लाभल्यावर रूपवतीची बुद्धी फिरली. ती व्रत करीनाशी झाली. तेव्हा तिचं वैभव ओसरलं. सुपर्णिका मात्र अगत्यानं व्रत करायची. रूपवतीलाही तिनं तिची चूक दाखवून दिली. मग रूपवतीचे डोळे उघडले. तिनं पुन्हा व्रत सुरू केलं. त्यामुळं शिवानं प्रसन्न होऊन तिला पूर्वीचं वैभव मिळवून दिलं.

## ३३ रघुनाथ-शिरोमणीची कथा

रघुनाथ-शिरोमणी नावाचा गाढा संस्कृत पंडित बंगालमध्ये होऊन गेला. लहानपणीच रघुनाथाचा बाप वारलेला. गरिबीच्या संसारात आईनं कसंबसं त्याचं संगोपन केलं. पुढं वासुदेव सार्वभौम यानं मुलगा हुशार आहे, असं पाहून त्याला आपल्याकडं ठेवून शास्त्रं पढवली. शिष्य शास्त्रपारंगत झालेला दिसून येताच गुरूनं त्याला मिथिलेला धाडलं. न्यायदर्शनाचं अध्ययन-अध्यापन यांसाठी मिथिलानगरी विख्यात होती. तिथं पक्षधर मिश्र नावाचा अत्यंत विद्वान पंडित होता. त्याच्याशी रघुनाथाचा वादविवाद झाला. त्यात रघुनाथानं त्याचा दारुण पराभव केला. पक्षधर मिश्र त्यामुळं एवढा चिडला, की, त्या भरात त्यानं रघुनाथाच्या तोंडात भडकावली. रघुनाथ त्यावेळी गप्प राहिला. पण त्याचा सूड घ्यायचं त्यानं ठरवलं. आणि रात्री तलवार घेऊन, त्याला मारण्यासाठी रघुनाथ त्याच्या घरी गेला. रघुनाथ घराच्या पायऱ्या चढून जातो, तर पक्षधर मिश्र आपल्या पत्नीशी रघुनाथाच्या विद्वत्तेबद्दल स्तुती करीत असल्याचं त्याच्या कानी पडलं. ते पाहून रघुनाथाचा राग ओसरला आणि त्यानं पक्षधर मिश्राची क्षमा मागितली.

## ३४ लबाड राजाला इंगा

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यावेळी नवलपुरात त्रिविक्रम नावाचा राजा राज्य करीत होता. गुणी व विद्वान लोकांचा चाहता म्हणून त्याची खरीखोटी प्रसिद्धी होती. काही कवींना वगैरे त्यानं आश्रय दिला होता, त्यामुळं त्याच्या लौकिकात भर पडलेली होती.

तसा राजा खरोखरीच चतुर नि बुद्धिमान होता. त्याची पठणशक्ती अन् स्मरणशक्ती कमालीची तल्लख होती. इतकी, की एखादी कविता फक्त एकदा ऐकली म्हणजे ती त्याला तोंडपाठ म्हणता येत असे. त्याच्या पदरी एक चलाख मुलगा होता. तो होता द्विपाठी. कोण-

तीही कविता दोनदा ऐकली, की तो ती लगेच पाठ म्हणत असे. त्या मुलासारखी तल्लख स्मरणशक्तीची आणखी एक मुलगीही राजाच्या पदरी होती. ती त्रिपाठी होती. एखादी कविता तीनदा ऐकली रे ऐकली की ती तिनं शब्दश: पाठ म्हणून दाखवलीच समजा. या दोघांनाही राजा दरबारात आपल्या सिंहासनाशेजारी बसवीत असे. त्यांच्या या गुणांचा उपयोग करून राजा कधीकधी एखाद्या कवीची खिल्ली उडवी.

कवींना बक्षिसे देण्याची राजाची ख्याती ऐकून एकदा दूरचा एक कवी त्रिविक्रम राजाच्या दरबारात येऊन दाखल झाला. आपण वेगळ्या तऱ्हेची, एक हृदयस्पर्शी कविता लिहिली असल्याचं त्यानं राजाला सांगितलं.

त्या कवीला आपल्याजवळच्या एका आसनावर बसायला सांगून राजा म्हणाला:

"हे पाहा कविवर्य, खरोखरीच तुमचं काव्य नवीन तऱ्हेचं, वाखाणण्यासारखं असलं, तर तुम्हाला बक्षीस देऊन तुमचा जरूर गौरव करू. मात्र तुम्ही सादर करणारी कविता तुमची स्वत:ची मौलिक आहे, अशी आमची खात्री पटली पाहिजे. तशी ती पटली, तर ज्या कशावर ती कविता तुम्ही लिहून आणली असेल, त्या वस्तूच्या वजनाइतकं सोनंही बहाल करू आम्ही तुम्हाला. पण लक्षात ठेवा—जर कदाचित तुमची कविता आमच्या माहितीची ठरली, तर मात्र तुमची रिकामी बोळवण करणं भाग पडेल आम्हाला. हां ! आता म्हणून दाखवा तुमची कविता."

राजाचं बोलणं ऐकून कवीला मोठी गंमत वाटली. आपली कविता नवीन, ताजी रचलेली नि हृदयस्पर्शी असल्यामुळं आपणाला चांगलं बक्षीस खास मिळणार, असा त्याला भरवसा वाटला. आणि खुषीत येऊन त्यानं आपली कविता मारे झोकात म्हणून दाखवली.

पण——पण

त्यानं ती कविता संपवून काही क्षण झाले नाहीत, तोच राजा स्वत: ती कविता घडाघड म्हणून दाखवू लागला. हे पाहून तो कवी चकित झाला. तो 'आ' वासून राजाकडं टकमक बघतच राहिला.

आपली नवीन कविता राजाला माहीत कशी ? याबद्दल तो नवल करीत राहिला.

–पण हे आश्चर्य काहीच नव्हे, असं त्या कवीला काही क्षणांतच कळून चुकलं. कारण आपण ती कविता म्हणून दाखवल्यावर राजा आपल्या शेजारच्या त्या मुलाकडं वळून हसतच म्हणाला:

" आणि या मुलालाही तुमची ही कविता अगदी तोंडपाठ आहे. प्रत्यक्षच पाहा ! – दाखव रे म्हणून. "

त्या कवीनं व नंतर राजानं अशी दोनदा म्हटलेली ती कविता त्या द्विपाठी मुलानं लागलीच घडाघड म्हणून दाखवली. तोवर तीनदा ऐकल्यामुळं त्या त्रिपाठी मुलाचीही ती कविता पाठ झाली होती. राजानं सांगताच तिनंही ती फडाफड बिनचूक म्हणून दाखवली.


बिचारा कवी हा अद्भुत प्रकार पाहून पुरता चीत झाला. हत-बुद्ध होऊन, खालच्या मानेनं तो भर दरबारातून निघून गेला.

त्याचवेळी त्या दरबारात, बाहेरून आलेला दुसरा एक कवी बसला होता. त्यानंही राजापुढं सादर करायला आपली एक कविता आणली होती. एका कवीला बघता बघता नामोहरम करण्याची, राजाची ती चलाखीची युक्ती त्याच्या चतुर बुद्धीनं हेरली. म्हणून त्यानं आणलेली आपली कविता यावेळी दरबारात सादर केली नाही. या हिकमती, लबाड राजाची शिताफीनं खोड मोडायची, असं मनाशी योजून तो कुणाला नकळत निघून गेला.

या चतुर कवीनं एक योजना ठरवली. त्याप्रमाणं आधी त्यानं कठीणांतल्या कठीण अशा शब्दांची अवघड कविता रचली. मग ती त्यानं एका भल्यामोठ्या फरशीच्या तुकड्यावर कोरून लिहिली. फरशीची ती पाटी कापडात गुंडाळून ती त्यानं उंटाच्या पाठीवर लादली. आणि मग त्या उंटासह कवींची स्वारी त्रिविक्रम राजाच्या दरबारात जाऊन दाखल झाली.

आपल्या नवीन कवितेचं गुणवर्णन त्यानं राजाकडं केलं आणि गुणाचं चीज व्हावं, अशी अपेक्षा व्यक्त केली.

" तुमची कविता स्वतंत्र, नवीन असल्याची आमची खात्री



पटली, तर तुमचा योग्य तो गौरव करू. शिवाय ज्यावर ती लिहिली असेल त्या वस्तूएवढ्या वजनाचं सोनं आम्ही तुम्हाला बहाल करू," वगैरे ठराविक बोलणं करून राजा मिस्किलपणे स्वतःशीच हसला.

चतुर कवीनं ते हसणं हेरलं; पण त्याकडे दुर्लक्ष करून तो आपली कविता म्हणू लागला. राजा त्या कवितेचे शब्द स्मरणात साठवण्यासाठी नेहमीप्रमाणे एकाग्रतेनं कान देऊन ऐकू लागला. पण या कवितेचे शब्द भारी कठीण अन् बोजड असल्यामुळे ते लक्षात ठेवण्याच्या कामी राजाची तिरपीट उडू लागली. एकेक शब्द लक्षात ठेवता ठेवता त्याच्या नाकी नऊ येऊ लागले.

तिकडं कवीची कविता म्हणून संपली. त्यानंतर चांगली पाच-दहा-पंधरा मिनिटं उलटून गेली, तरी गोंधळून गेलेल्या राजाला ती कविता सुरू करणंही मुश्कील झालं. वेळ जसजसा वाढत चालला, तसतसा राजाचा चेहरा उतरत चालला. शेजारच्या त्या मुलाला अगर मुलीला तरी ती कविता पाठ झालीय का, हे अजमावण्यासाठी

राजानं त्यांच्याकडं आशाळभूतपणे पाहिलं; पण तिकडूनही त्याची पुरती निराशा झाली. कारण– दोनदा ऐकल्याखेरीज त्या द्विपाठी मुलाला अन् तीनदा ऐकल्याविना त्या त्रिपाठी मुलीला ती कविता कोणत्या आधारावर म्हणता येणार ?

झालं ! राजा अखेर चीत झाला– पुरता हरला ! शेवटी नाइलाजानं, वरपांगी कसंनुसं हसत म्हणाला–

"कवीराज, पटली आमची खात्री. कविता तुमचीच स्वतःची, नवीन आहे खरी. त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद ! आता... ज्या कशावर तुम्ही ती लिहून आणली असेल, ती वस्तू दाखवा. म्हणजे मग तिच्या वजनाइतकं सोनं, कबूल केल्याप्रमाणं आम्ही आपणाला देऊ."

–आणि कागदाचं एखादं भेंडोळं कवी बाहेर काढील, ते पाहण्यासाठी राजासह सर्वजण उत्कंठित झाले. तर काय ? कवीनं उंटाच्या पाठीवर लादलेली ती फरशीची लांबलचक पाटी, एकदोघांच्या मदतीनं राजाच्या पुढ्यात आणून ठेवली.

फरशीच्या भल्यामोठ्या पाटीवर ती कविता लिहून आणलेली पाहून राजा अन् सारा दरबार थक्क झाला. तेवढ्यात तो कवी मिस्किलपणे म्हणाला–

"महाराज, मला कविता सुचली, तेव्हा ती लिहून घ्यायला या फरशीच्या पाटीशिवाय दुसरं काही हाताशी मिळालं नाही. स्फूर्तीच्या भरात मग त्यावरच ही कविता लिहून काढली झालं !"

राजाची मती खुंटली. तो स्तंभित झाला. फरशीच्या त्या वजनदार पाटीच्या वजनाएवढं सोनं द्यायचं म्हणजे... पण प्राप्त प्रसंगातून वाट कशी काढावी हे त्याला खूप विचार करूनही सुचेना. प्रधानही हतबुद्ध होऊन गेला होता.

अखेर, अब्रू वाचवण्यासाठी त्या फरशीच्या पाटीच्या वजनाएवढं सोनं त्या कवीला देण्याखेरीज गत्यंतर उरलं नाही.

मात्र तेव्हापासून कवीची खिल्ली उडवण्याच्या भरीस त्रिविक्रम राजा पुन्हा कधी पडला नाही, हे सांगायला नकोच.

## ३५. मंथरक

एका गावात मंथरक नावाचा विणकर होता. एकदा विणकाम चालू असता त्याचा माग मोडून गेला. तेव्हा तो कुऱ्हाड घेऊन लाकडे आणायला रानात गेला. समुद्रकिनाऱ्यावर तो फिरत असता त्याला शिसवीचे झाड दिसले. ते झाड पाहून त्याने विचार केला, "हे तोडले तर यातून मागासाठी लागणारी पुष्कळ लाकडे मिळतील."

असा विचार करून घाव घालण्यासाठी त्याने कुऱ्हाड उगारली. त्या झाडावर एक अप्सरा राहत होती. ती विणकराला म्हणाली, "अरे, मी या झाडाचा आश्रय घेतला आहे. मी येथे बसले, की समुद्राचा गार वारा येतो आणि मला आराम वाटतो. म्हणून हे झाड तू तोडू नकोस."

विणकर म्हणाला, "माझा काय इलाज? ती लाकडे नेऊन मी माग तयार केला नाही, तर माझ्या कुटुंबाला उपास पडतील. तूच दुसरीकडे जा, मी हे झाड तोडणारच!"

अप्सरा म्हणाली, "मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला जे हवे असेल ते माग, पण या झाडाचे रक्षण कर."

"असे असेल तर मी घरी जाऊन मित्राला आणि पत्नीला विचारून येतो. मग तू मला त्याप्रमाणे दे." विणकर म्हणाला.

"तसेच करू!" असे अप्सरेने सांगितल्यावर विणकर आनंदाने घराकडे परतला. गावात शिरताना त्याचा मित्र असलेला न्हावी भेटला. अप्सरा काय म्हणाली ते त्याने त्याला सांगितले आणि विचारले, "तेव्हा मित्रा, त्या अप्सरेजवळून काय मागून घेऊ ते सांग."

"मित्रा, असे असेल तर तू राज्यच मागून घे. तू राजा होशील आणि मी तुझा मंत्री होईन. आपण दोघे या जगातील सुख अनुभवून परलोकातीलही सुख अनुभवू! म्हणतातच की, दानशूर राजा या जगात कीर्ती मिळवितो आणि त्या कीर्तीमुळे स्वर्गातील देवांच्याही बरोबरीचा होतो."

"तू म्हणतोस ते बरोबर आहे; परंतु मी बायकोला विचारतो."

न्हावी म्हणाला, "मित्रा, बायकांना बुद्धी फार कमी असते म्हणून बायकांचा सल्ला घेणे शास्त्राविरुद्ध आहे."

विणकर म्हणाला, "तरीसुद्धा मी तिला विचारून सांगतो. ती पतिव्रता आहे. तिला विचारल्याशिवाय मी काहीच करीत नाही."

असे म्हणून तो घरी गेला व बायकोला म्हणाला, "प्रिये, एक अप्सरा मला प्रसन्न झाली आहे. ती मला पाहिजे असेल ते देईल: तेव्हा मी तुला विचारायला आलो आहे, की काय मागून घ्यावे ? माझा न्हावी मित्र म्हणतो, 'मी राज्य मागावे.' "

ती म्हणाली, "प्राणनाथ, या न्हाव्यांना काही अक्कल असते का ? त्याचे काही ऐकू नका. म्हणतातच की, चारण स्तुतिपाठक, बालक, न्हावी, हलके पुरुष आणि भिक्षुक यांचा सल्ला शहाण्याने ऐकू नये. म्हणून राजा होण्याची इच्छा करू नये. बंधू आणि मुले राज्यासाठी राजाला ठारही करतात. तेव्हा या राज्याचा दुरूनच त्याग करावा."

"तू म्हणतेस ते खरे आहे; पण मी काय मागून घेऊ ते सांग ना ?" विणकर म्हणाला.

ती म्हणाली, "तू नेहमी एकच वस्त्र विणतोस. त्याने संसाराचा खर्च कसाबसा भागतो. तेव्हा तू स्वत:साठी आणखी दोन हात आणि एक डोके मागून घे. म्हणजे एक वस्त्र पुढच्या हातांनी आणि एक वस्त्र मागच्या हातांनी अशी दोन वस्त्रे तू विणू शकशील ! एका वस्त्राच्या विक्रीतून नेहमीप्रमाणे घरखर्च चालेल आणि दुसऱ्याच्या विक्रीतून खास कामे करता येतील. त्यामुळे आपल्या जातीत आपल्याला मान मिळेल आणि जगात आणि परलोकीही सुखाने राहता येईल."

हा सल्ला ऐकून कोष्टयाला आनंद झाला व तो म्हणाला, "शाबास पतिव्रते ! शाबास ! तू योग्य सल्ला दिलास. तुझ्या सल्ल्याप्रमाणेच करीन हे पक्केच ठरले !"

नंतर तो अप्सरेकडे गेला आणि प्रार्थनापूर्वक म्हणाला, "मी मागीन तेच देणार असशील, तर मला आणखी दोन हात आणि डोके दे !" असे तो म्हणतो आहे त्याच क्षणी तो चार हातांचा आणि दोन

डोक्यांचा झाला.

मग संतुष्ट होऊन तो घरी यायला निघाला; परंतु लोकांनी त्याला पाहिल्याबरोबर त्यांना 'हा राक्षस आहे,' असे वाटले आणि लोकांनी त्याला काठ्या आणि दगड मारले आणि तो मेला.

## ३६ म. जोतिबा फुले

–एकोणिसाव्या शतकातील प्रख्यात समाजक्रांतिकारक म. जोतिबा फुले यांचा जन्म १८२७ साली झाला. जोतीची आई त्याच्या जन्मानंतर अवघ्या वर्षभरात वारली. त्यामुळं त्याच्या पालनपोषणाची जोखीम त्याचे वडील गोविंदराव यांच्यावर पडली. एका दाईनं त्याचं संगोपन केलं.

लहानपणी जोतीनं धडपडून आपलं शिक्षण केलं. समज आल्यावर त्याला समाजातली विषमता, जातिभेद, अज्ञान, दलितांवर अन्याय करणाऱ्या रूढी पाहून खूप मनस्ताप झाला. पुढं त्याची मावसबहीण सगुणाबाई क्षीरसागर हिच्या प्रेरणेनं समाजसेवा व सामाजिक सुधारणा करण्याचं प्रोत्साहन त्याला मिळालं.

त्या काळातल्या रूढीप्रमाणे जोतीचं लग्न त्याच्या वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी सावित्रीबाईशी झालं. तिलाही सगुणाबाईंनी समाजसेवेची दीक्षा दिली.

विशी ओलांडली, तसे लोक जोतीला जोतिबा म्हणून संबोधू लागले. जोतिबांनी सावित्रीला लिहायला-वाचायला शिकवलंच होतं. तर तिच्या सहकार्यानं १८४८ साली त्यांनी मुलींची शाळा पुण्यात काढली. काही ब्राह्मण मित्रांनीही या कामी त्यांना साहाय्य केलं, पण सनातनी ब्राह्मण मंडळीला हा भ्रष्टाचार वाटला व ते त्यांना धमक्या देऊ लागले, पण या लोकांच्या निंदेला व धमकावण्यांना न डगमगता जोतिबांनी आपलं लोकशिक्षणाचं कार्य चालूच ठेवलं. मुलींच्या शाळेत

शिकवायला जाणाऱ्या सावित्रीबाईंवर सनातनी विचारांच्या लोकांनी कधी दगड मारले, तर कधी शेणसुद्धा फेकलं, पण सावित्रीबाई आपल्या कर्तव्यापासून ढळल्या नाहीत.

गरीब विद्यार्थ्यांना जोतिबा पाट्या-पेन्सिली व पुस्तकंही देत. हळूहळू जोतिबांनी पुण्यात मुलींच्या आणखी दोन शाळा काढल्या. वाचनालयही काढलं. कनिष्ठ समाजातल्या मुलांना व मुलींना शिक्षण देण्याचं जोतिबांचं कार्य सहकारी शिक्षणखात्याच्या दृष्टीनं एवढं गौरवास्पद ठरलं की, जोतिबांच्या शाळांना त्याच्याकडून अनुदान मिळू लागलं. एवढंच नव्हे, तर त्या खात्यातर्फे त्यांचा जाहीर सत्कार करून त्यांना शालजोडी अर्पण करण्यात आली.

पुढं १८५५ साली जोतिबांनी समाजातली अंधश्रद्धा व सनातनी ब्राह्मणांनी स्वार्थापोटी देवधर्माविषयी रूढ केलेल्या अनिष्ट प्रथा यांच्यावर टीका करणारं 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिलं. त्यामुळं त्या लोकांत जोतिबांविरुद्ध वातावरण निर्माण झालं. काहीजण तर एवढे चिडले की, त्यांनी जोतिबांवर दोन मारेकरी घातले.

एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास सुरे घेऊन हे मारेकरी जोतिबांच्या घरात शिरले. खुडबुड ऐकून जोतिबा जागे झाले. पाहतात तर दोघेजण सुरे घेऊन त्यांच्यावर चालून आलेले. जोतिबांनी त्यांना विचारलं, "तुम्ही कोण ? का आलायत ?"

"तुम्हाला ठार मारायचंय आम्हाला." ते मारेकरी उद्‌गारले.

"अरे, पण मी तुमचा गुन्हा तरी काय केलाय ? मला मारायचं कारण काय ?" जोतिबांनी विचारलं.

"आमचा कसलाच गुन्हा तुम्ही नाही केलेला." मारेकरी बोलले, "पण तुम्हाला ठार मारायची कामगिरी सोपवलीय काही लोकांनी आमच्यावर."

"पण मला ठार करून तुम्हाला काय मिळणार ?" जोतिबांनी विचारलं.

"आम्हाला प्रत्येकाला एकेक हजार रुपये मिळणार आहेत." मारेकऱ्यांनी स्पष्ट सांगितलं.

"असं होय ?" जोतिबा उद्‌गारले. "मला मारून तुमचा खरोखरीच फायदा होणार असला, तर खुशाल मारा मला. गोरगरिबांची सेवा करण्यासाठी मी जिवापाड झटतोय. मग माझी हत्या करून तुमच्यासारख्या गरिबांचं भलं होत असेल, तर तेही मी माझं भाग्यच समजेन. कारण माझं मरण सत्कारणी लागेल ! चला– चालवा तुमचं हत्यार!"

जोतिबांच्या त्या बेडर व कळकळीच्या उद्‌गारांनी मारेकऱ्यांचं हृदय गलबललं. त्यांनी तत्काल आपले सुरे टाकून दिले आणि जोतिबांचे चक्क पाय धरले.

हेच मारेकरी– रोढे व कुंभार– नंतर जोतिबांचे अनुयायी बनले. रोढे तर त्यांचा शरीररक्षक बनला.

विधवाविवाह व बालहत्याप्रतिबंध यांच्या चळवळीही जोतिबांनी केल्या. १८६६ साली त्यांनी आपल्या घरचा पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. अशाप्रकारे आपण कर्तेसुधारक असल्याचं त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केलं.

आपले वडील वारले, तेव्हा जोतिबांनी अनाथ-अपंगांना जेवण घातलं. तर त्यांच्या वर्षश्राद्धानिमित्तही जोतिबांनी गोरगरिबांना जेवण घालून गरीब विद्यार्थ्यांना पुस्तकं वाटली.

जोतिबांच्या सर्व समाजसुधारणाकार्यात त्यांना सावित्रीबाईंनी पूर्ण सहकार्य केलं.

आपली चळवळ नीट चालवण्यासाठी जोतिबांनी 'सत्यशोधक समाज' ही संस्था स्थापली. या संस्थेमार्फत अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या. भटाब्राह्मणांच्या उपाध्येगिरीला डावलून अनेकांची लग्नं लावून दिली. मात्र त्यांचा विरोध ब्राह्मणांना नव्हता; तर ब्राह्मण्याला होता. भिक्षुकशाहीला होता.

जोतिबांनी १८८० साली रायगडावरील शिवाजीमहाराजांच्या पडक्या समाधीच्या जीर्णोद्धाराचा पाया घातला.

पुढं १८८८ साली मुंबईला एका मोठ्या जाहीर सभेत जोतिबांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली. आधुनिक भारतातले पहिले निष्ठावंत समाजसुधारक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची लोकांनी दिलेली ही

पावतीच होती.

पण याच वर्षी अर्धांगवायूचा झटका येऊन जोतिबा आजारी पडले. नंतर १८९० साली २८ नोव्हेंबर रोजी त्यांचं निधन झालं.

'शेतकऱ्याचा आसूड', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' ही त्यांची पुस्तकं विशेष गाजली.

## ३७ परमेश्वराचें दर्शन


एकदा एक राजा आपल्या धर्माध्यक्षाला म्हणाला : "परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे, असं तुम्ही नेहमी सांगत असता. तर मला एकदा तो दाखवा की!"

"महाराज, परमेश्वर खरोखरीच सर्वत्र भरलेला आहे," धर्माध्यक्ष उत्तरला, "त्याचं एकच स्थान आपण पाहू या, चला."

आणि धर्माध्यक्ष राजाला बाहेरच्या पटांगणात घेऊन गेला. सूर्याकडं बोट दाखवीत तो म्हणाला : "महाराज, या सूर्याकडं जरा पाहा बघू. किती वेळ पाहता ते बघू."

सूर्याकडं अवघे काही क्षण पाहून मान दुसरीकडं वळवीत राजा बोलला : "छे–छेः! डोळे दिपून गेले! त्याच्याकडं कसं पाहणार?"

"पाहिलंत?" धर्माध्यक्ष उद्गारला, "परमेश्वरी तेजाच्या या एका स्थानाकडं आपण फार वेळ पाहू शकत नाही. मग ही चराचर सृष्टी निर्माण करणाऱ्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या अनंतपटींनी तेजस्वी असलेल्या रूपाचं दर्शन तुम्ही कसं घेऊ शकणार?"



म. ग्रं. सं. ठाणे,
१०६७ २८।४।९५
वा. वा.
BVBK-0401761